RNI NO. MAHMAR/2020/84035

Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लियेही
हम जाने जाते है।
Sachin Sir's English Speaking
9028851719

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

मंगळवार ०१ जून २०२५ | वर्ष : ५ | अंक : १८४ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Tuesday 01 June 2025 | Year : 5 | Issue : 184 | Daily | Rate: Rs. 5/-

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451



## संविधानातील कोणत्याही शब्दाला स्पर्श झाला तर काँग्रेस त्याचा तीव्र विरोध करेल : मल्लिकार्जुन खर्गे

**संघाचे सरचिटणीस दत्तात्रेय होसाबळे यांनी नुकतेच संविधानाच्या प्रस्तावनेतून 'समाजवाद' आणि 'धर्मनिरपेक्षता' हे शब्द काढून टाकण्याबाबत भाष्य केले. या विधानानंतर देशातील राजकारण तापले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी यावर तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. बेंगळुरूमध्ये माध्यमांशी बोलतांना ते म्हणाले की, जर संविधानातील कोणत्याही शब्दाला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला गेला तर काँग्रेस त्याचा तीव्र विरोध करेल.**

**नवी दिल्ली :** संघाचे सरचिटणीस दत्तात्रेय होसाबळे यांनी नुकतेच संविधानाच्या प्रस्तावनेतून समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता हे शब्द काढून टाकण्याबाबत भाष्य केले. होसाबळे यांच्या या विधानानंतर देशातील राजकीय उष्णता वाढत असल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीत आता काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी याप्रकरणी आपली प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी म्हटले आहे की, जर संविधानातील कोणत्याही शब्दाला स्पर्श झाला तर काँग्रेस त्याचा तीव्र विरोध करेल आणि शेवटच्या श्वासापर्यंत लढेल.

बंगळुरूमध्ये पत्रकारांशी बोलतांना मल्लिकार्जुन खर्गे यांनी होसाबळे यांना मनुस्मृतीचे समर्थक म्हटले. ते म्हणाले की, त्यांना गरीब आणि दुर्बल घटकांची प्रगती नको आहे. त्यांना हजारो वर्षे जुनी व्यवस्था टिकवून ठेवायची आहे. म्हणूनच त्यांना समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि संविधानाची मुख्य तत्वे आवडत नाहीत. ते म्हणाले की, ही केवळ होसाबळेंची विचारसरणी नाही, तर संपूर्ण



आरएसएसची विचारसरणी आहे. दत्तात्रेय होसबळे यांनी नुकतेच एका कार्यक्रमात म्हटले होते की, डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांनी संविधानाच्या मूळ प्रस्तावनेत हे शब्द ठेवले नव्हते. ते म्हणाले की, आणीबाणीच्या काळात, जेव्हा देशात मूलभूत अधिकार निलंबित करण्यात आले होते आणि संसद कार्यरत नव्हती, तेव्हा हे शब्द जोडले गेले होते. हे शब्द प्रस्तावनेत ठेवावेत की नाही यावर पुन्हा चर्चा व्हावी, असेही होसबळे यांनी सुचवले. खरगे यांनी आरएसएसला एक महत्त्वाचे आवाहन केले. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणाले की,

> "आरएसएस गरीब, दलित, मागासवर्गीय आणि इतर कमकुवत समुदायांच्या विरोधात आहे. जर ते खरोखरच हिंदू धर्माचे रक्षक असतील तर त्यांनी प्रथम अस्पृश्यतेसारख्या दुष्प्रवृत्तींचा अंत करावा. आरएसएसकडे इतके संसाधने आणि सदस्य आहेत की त्यांनी अस्पृश्यता संपवण्यासाठी काम करावे, आणि केवळ कथा बनवून देशात गोंधळ पसरवू नये.
>
> – मल्लिकार्जुन खर्गे

देशात जातीय सलोखा आणि एकता राखणे खूप महत्वाचे आहे. त्यांनी आरएसएसला केवळ विधाने करू नका तर काम करण्याचे आवाहन केले. खर्गे म्हणाले की, आम्ही संविधानातील कोणत्याही शब्दाला स्पर्श करू देणार नाही. हा आपल्या देशाचा आत्मा आहे आणि त्याचे रक्षण करण्यासाठी आम्ही आमच्या सर्व शक्तीनिशी लढू. देशात संविधानाच्या प्रस्तावनेबद्दल आणि त्यातील शब्दांबद्दल राजकीय वादविवाद तीव्र होत असताना खरगे यांचे हे विधान लक्षात घेण्यासारखे आहे. अशा परिस्थितीत, काँग्रेसने स्पष्ट केले आहे की ते संविधानाच्या त्या मूलभूत तत्त्वांचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक परिस्थितीत उभे राहील, ज्यांच्या आधारे भारत एक मजबूत आणि समावेशक लोकशाही बनला आहे.

## सर्वोच्च न्यायालयाने ललित मोदी यांची याचिका फेटाळली...



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (30 जून) इंडियन प्रीमियर लीगचे माजी चेअरमन ललित मोदी यांची एक याचिका फेटाळली आहे. या याचिकेद्वारे मोदी यांनी सर्वोच्च न्यालयाला विनंती केली होती की त्यांना सक्तवसुली संचालनालयाने परकीय चलन व्यवस्थापन कायद्यांतर्गत ठोठावलेला 10.65 कोटी रुपयांचा दंड बीसीसीआयला भरण्याचा आदेश द्यावा. सर्वोच्च न्यालयातील न्यायमूर्ती पी.एस. नरसिम्हा व आर. महादेवन यांच्या बेंचसमोर आज मोदी यांच्या याचिकेवरील सुनावणी पार पडली. यावेळी न्यायमूर्तींनी मोदी यांची याचिका फेटाळली. याचवेळी न्यायमूर्तींनी स्पष्ट केले की मोदी हे उपलब्ध नागरी कायद्यांचा, उपायांचा लाभ घेण्यास पात्र असतील.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की बीसीसीआय हे राज्यघटनेच्या कलम 12 अंतर्गत 'स्टेट' (राज्य) नाही. म्हणजेच ते थेट सरकारच्या नियंत्रणाखालील प्राधिकरण नाही किंवा सरकारप्रमाणे काम करणारी संस्था नाही. त्यामुळे कलम 226 अंतर्गत थेट रिट अधिकारक्षेत्रात येत नाही. मात्र, ललित मोदी त्यांच्या कायदेशीर प्रक्रियेसाठी दिवाणी न्यायालयात जाऊ शकतात. लाईव्ह लॉने यासंदर्भातील वृत्त प्रसिद्ध केलं आहे. हीच याचिका ललित मोदी यांनी यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयासमोर सादर केली होती. त्यावेळी न्यायालयाने त्यांना एक लाख रुपयांचा दंड ठोठावला होता. तसेच त्यांची याचिका देखील फेटाळली होती. मोदी यांनी मुंबई उच्च न्यायालयाकडे मागणी केली होती की सक्तवसुली संचालनालयाने त्यांना ठोठावलेला 10.65 कोटी रुपयांचा दंड बीसीसीआयला भरण्याचा आदेश द्यावा. गेल्या वर्षी, 19 डिसेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली होती. न्यायालयाने त्यावेळी म्हटले होते की 'ललित मोदींवर लावलेला दंड हा फेमा अंतर्गत न्यायाधिकरणाने ठोठावला आहे. त्यामुळे ही याचिका निरर्थक व पूर्णपणे चुकीची आहे.' उच्च न्यालायाने स्पष्ट शब्दांत सांगितलं होतं की सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही ललित मोदी यांनी 2018 मध्ये ही याचिका दाखल केली होती.

## भारतात बंकर-बस्टर प्रणाली विकसित करण्याच्या कामाला गती



**नवी दिल्ली :** गेल्या आठवड्यात अमेरिकेने इराणच्या फोर्डो अणु प्रकल्पावर GBU-5 ने हवाई हल्ले केल्यानंतर भारत प्रगत बंकर-बस्टर प्रणाली विकसित करण्याच्या कामाला गती देत आहे. अलीकडील काळातील जागतिक संघर्षांपासून धडा घेत, भारत भूमिगत लक्ष्यांना भेदण्यास सक्षम असलेली एक शक्तिशाली नवीन क्षेपणास्त्र प्रणाली तयार करून भविष्यातील युद्धांची तयारी करत आहे. यामुळे भारताची पाकिस्तान आणि चीनसारख्या शेजारी देशांशी सामना करण्याची क्षमता आणखी वाढणार आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (डीआरडीओ) अग्नि-5 आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची प्रगत आवृत्ती विकसित करत आहे. मूळ आवृत्तीपेक्षा याची श्रेणी 5000 किलोमीटरपेक्षा जास्त असून, त्यामध्ये अण्वस्त्रे वाहून नेण्याची क्षमता असेल. ही नवीन आवृत्ती 7500 किलो वजनाचे बंकर-बस्टर वॉरहेड वाहून नेण्यास सक्षम असलेले पारंपरिक शस्त्र असेल.

## आमदार टी राजा सिंह यांचा तडकाफडकी राजीनामा





**तेलंगणा :** तेलंगणात भारतीय जनता पक्षाला सर्वात मोठा धक्का बसला आहे. भाजपाचे आमदार टी राजा सिंह यांनी पक्षाचा तडकाफडकी राजीनामा दिला असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे तेलंगणाच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. आमदार टी राजा सिंह यांनी भाजपाचा राजीनामा का दिला? याबाबत आता अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. आमदार टी राजा सिंह यांनी आज तेलंगणा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष जी किशन रेड्डी यांना एक पत्र लिहिले. या पत्राच्या माध्यमातून त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे. भारतीय जनता पक्षाच्या तेलंगणाच्या राज्याच्या नेतृत्वासाठी सुरु असलेल्या संघर्षावरून टी राजा सिंह हे नाराज असल्याचे बोलले जात आहे.

## भारत करतो ब्रह्मोसपेक्षा घातक मिसाईलची चाचणी



**नवी दिल्ली :** भारत लवकरच आपल्या इंटरकॉन्टिनेंटल बॅलिस्टिक K-6 हायपरसोनिक मिसाईलची चाचणी घेणार आहे. ही मिसाईल संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (DRDO) द्वारे विकसित केले जात असून, भारताच्या S-5 श्रेणीच्या न्यूक्लियर पाणबुडीमध्ये तैनात केले जाईल. या मिसाईलची खास बाब म्हणजे, या K-6 चा वेग आणि पल्ला भारताच्या सर्वात शक्तीशाली ब्रह्मोस क्षेपणास्त्रापेक्षा चांगला असेल. हे क्षेपणास्त्र भारताला पाकिस्तान आणि चीनसारख्या शत्रू देशांचा अधिक प्रभावीपणे प्रतिकार करण्यास मदत करेल. हैदराबादस्थित DRDO च्या प्रगत नौदल प्रणाली प्रयोगशाळेत विकसित केले जाणारे K-6 हे भारतातील सर्वात प्रगत आणि प्राणघातक क्षेपणास्त्रांपैकी एक असेल. अणु पाणबुडीतून प्रक्षेपित केलेले हे हायपरसोनिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्र भारताला जगातील सर्वात सक्षम देशांच्या यादीत स्थान देईल. ही मिसाईल S-5 श्रेणीच्या अणु पाणबुड्यांमधून प्रक्षेपित केली जाईल. समुद्री चाचण्यांमुळे च-6 क्षेपणास्त्र हायपरसोनिक वेग गाठण्यास सक्षम असेल. हायपरसोनिक म्हणजे मॅक 7.5 (ध्वनीच्या वेगाच्या साडेसात पट) किंवा ताशी 9,200 किलोमीटर आहे. या क्षेपणास्त्राची ऑपरेशनल रेंज 8,000 किलोमीटर आहे.

## केमिकल कारखान्यातील भीषण स्फोटात 12 जणांचा मृत्यू

**तेलंगणा :** सोमवारी तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील एका रासायनिक कारखान्यात झालेल्या रिॲक्टर स्फोटात किमान 12 जणांचा मृत्यू झाला असून, 34 जण जखमी झाले आहेत. स्फोटावेळी कारखाण्याच्या इमारतीत 50 हून अधिक लोक होते आणि अनेक जण अजूनही आत अडकले आहेत. सुटका करण्यात आलेल्यांपैकी काही जण गंभीर जखमी आहेत. आत किती लोक अडकले आहेत हे आम्हाला अद्याप कळलेले नाही असे पोलीसांनी सांगितले आहे. अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, बचाव आणि मदत कार्यासाठी अग्निशमन दलाच्या 11 गाड्या घटनास्थळी पाठवण्यात आल्या आहेत. जिल्हा प्रशासनाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, 'आग विझवण्याचे काम सुरू आहे आणि काही लोक अजूनही इमारतीत अडकले आहेत.'



**प्रधानमंत्रींनी जाहीर केली आर्थिक मदत**

तेलंगणामधील घटनेवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे. पीएमओने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर पोस्ट करत लिहिले की, 'तेलंगणातील संगारेड्डी येथील कारखान्यातील आगीच्या घटनेत झालेल्या मृत्यूंमुळे मला दुःख झाले आहे. ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्यांच्याबद्दल मी शोक व्यक्त करतो. जखमी लवकर बरे व्हावेत अशी मी प्रार्थना करतो. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येक मृतांच्या कुटुंबियांना 2 लाख रुपये मदत दिली जाईल. तर जखमींना 50,000 रुपये दिले जातील.' दरम्यान, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे.

## शिमल्यात पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळली पाच मजली इमारत

**चंदिगड :** हिमाचल प्रदेशची राजधानी शिमल्यात दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडतो. या पावसामुळे डोंगराळ भागात दरड कोसळल्याच्या घटना समोर येत आहेत. सोमवारी (30 जून) सकाळी शिमल्यातील भट्टाकूफर माठू कॉलोनीतील एक पाच मजली इमारत (भवन) पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

## सर्व सामान्यांच्या खिशावर येणार भार!

**नवी दिल्ली :** 1 जुलै 2025 पासून अनेक नवीन आर्थिक नियम लागू होणार आहेत, ज्याचा थेट परिणाम तुमच्या खिशावर होऊ शकतो. अशा परिस्थितीत, 1 जुलैपासून कोणते नवीन नियम लागू होणार आहेत हे जाणून घेणे तुमच्यासाठी खूप महत्वाचे ठरणार आहे. यामध्ये UPI चार्जबॅक, नवीन तत्काळ ट्रेन तिकीट बुकिंग आणि पॅन कार्ड नियमांमध्ये बदल यांचा समावेश आहे. नवीन पॅन कार्डसाठी अर्ज करण्यासाठी 1 जुलैपासून आधार कार्ड असणे आवश्यक आहे. यापूर्वी, तुम्ही कोणत्याही वैध कागदपत्राद्वारे किंवा जन्म प्रमाणपत्राद्वारे पॅन कार्डसाठी अर्ज करू शकत होता. जुलै 2025 पासून तत्काळ तिकीट बुकिंगसाठी अनेक नवीन नियम लागू होतील. 1 जुलै 2025 पासून, आयआरसीटीसी वेबसाइट किंवा त्यांच्या मोबाइल ॲपद्वारे तत्काळ ट्रेन तिकिटांसाठी आधार पडताळणी अनिवार्य असेल. आतापर्यंत कोणत्याही व्यवहारावरील चार्जबॅक दावा नाकारला गेला तर बँकेला नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून परवानगी घेतल्यानंतर केस पुन्हा सुरु करावी लागत होती. परंतु 20 जून 2025 रोजी जाहीर झालेल्या नवीन नियमानुसार, बँका आता एनपीसीआयच्या मंजुरीची वाट न पाहता स्वतःहून चार्जबॅक दावे पुन्हा प्रक्रिया करू शकतात. भारतीय रेल्वे 1 जुलैपासून प्रवासी भाड्यात किरकोळ वाढ करणार आहे. रेल्वे प्रवाशांसाठी भारतीय रेल्वेकडून बदल करण्यात येत आहेत. 1 जुलै 2025 पासून हे बदल होणार आहेत.

## सरकार पुन्हा एक पायल तडवी होण्याची वाट बघत आहे काय?

### बौद्ध विद्यार्थ्यावर अमानुष अत्याचार

**कर्जत :** महारड्या, कमी मार्क घेऊन आलास आमच्यामध्ये बसण्याची लायकी नाही, असे धमकावत कर्जतच्या डॉ. एन.वाय. तासगावकर कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्याला जातीवाचक शिविगाळ व अर्हतच्या गुप्तांगावर लाथा मारल्या मारहाणीत जखमी झालेला अरहंत चांदई (ता. कर्जत, जि. रायगड) येथील डॉ. एन.वाय. तासगावकर कॉलेज ऑफ फिजिओथेरपीमध्ये पहिल्या वर्षाला शिकत असलेल्या अरहंत मनोज लेंडाणे (वय 21) या बौद्ध विद्यार्थ्याला या कॉलेजमध्ये शिकत असलेल्या जातियवादी 12 सिनियर विद्यार्थ्यांनी रॅगिंग करीत लाथा बुक्क्यांनी व हॉकीस्टीकने जातीवाचक शिवीगाळ करीत अमानुष मारहाण केली. 12 विद्यार्थ्यांवर ॲट्रोसिटी अंतर्गत गुन्हा नोंद केला आहे, कमी मार्क्स घेऊन आलास आणि आमच्यामध्ये बसलास, तुझी आमच्यामध्ये बसण्याची लायकी नाही आणि डॉक्टर बनायला आलास, अशी जातीवाचक शिवीगाळ करीत अरहंतला मारहाण करण्यात आली. या जातीयवादी विद्यार्थ्यांनी



अरहंतच्या गुप्तांगावरही लाथा घातल्या. हा प्रकार 2 जून रोजी घडला. अरहंत याची तक्रार करील या भितीने जातीयवादी विद्यार्थ्यांनी अरहंतला खोलीत डांबले. 22 जून रोजी अरहंतने मारहाणीचे फोटो आई-वडीलांना पाठविले. त्यानंतर आई-वडीलांनी अरहंतला घेऊन पोलिस स्टेशन गाठले. अरहंतच्या तक्रारीवरून 12 जातीयवादी विद्यार्थ्यांवार 24 जून रोजी मारहाणीचा व ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल झाला, तक्रार दाखल होऊन 5 दिवस उलटले तरी पोलिसांनी अद्याप आरोपींना अटक केली नाही. आरोपी विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याची मागणी अरहंतच्या आई मेनका लेंडाणे यांनी तासगावकर कॉलेजकडे केली.

**PROPERTY FOR SALE**





Prime Land with Construction for Sale

**Wela (Hari), Shankarpur rood, Nagpur gramin.**

Perfect for Educational Institutions:
Area 0.46 hectares (50,000 Sq. Ft) with construction around 35000 Sq. Ft., ideal for schools, colleges, Training Centers, Residential Tution College, Hotel, hostel, Ombudsman Park.

**Contact : Sulay 9860361121**

## सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले, गरीब समाजावर अन्याय : जयंत पाटील

**मुंबई :** राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले. राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी 57 हजार 509 कोटीच्या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारला पहिल्या दिवशी धारेवर धरले आहे. राज्यावरील आर्थिक बोजा वाढला आहे, सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले आहे, त्यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होतो आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.





याबाबत अधिक बोलताना ते म्हणाले आहेत की, चालू आर्थिक वर्षात मांडलेल्या अर्थसंकल्पात सरकारने एक विक्रम केला असा मी उल्लेख केला होता. त्यावेळी महसुली तूट ही 45 हजार 891 कोटी रुपयांची होती. राज्याच्या अर्थमंत्रांनी पुन्हा पुरवणी मागण्या मांडल्या, त्या 57 हजार 509 कोटीच्या आहेत. सरकारचे बहुमत असल्याने या पुरवणी मागण्या मंजूर होतील. त्यावेळी सरकारला 1 लाख 3 हजार 400 कोटी कमी पडणार आहेत. पूर्वीच्या आणि आताच्या पुरवणी मागण्या मिळून सरकारने अजून एक नवा विक्रम रचला आहे, असे ते म्हणाले.?

पुरवणी मागण्या समोर मांडायच्या आणि ते पैसे खर्च करायचे नाही असे या सरकारचे सुरू आहे. यापुढे हिवाळी अधिवेशन येणार आहे. पुढचा अर्थसंकल्प मांडण्याच्या आधी एक पुरवणी मागणी येणार. म्हणजे राज्याची महसूली तूट हे सरकार दीड किंवा दोन लाख कोटींपर्यंत पोहोचवतील. याचा अर्थ असा की, सरकारला सर्व आकडे कागदावर दाखवणे आवश्यक आहे. नाहीतर ज्यांच्याकडून पैसे घेतले आहेत किंवा ज्यांचे देणे बाकी आहे असे लोक एकतर आत्महत्या करतील अन्यथा यांच्या मागे लागतील. म्हणून सरकारने राज्याच्या अर्थकारणामध्ये एवढ्या मोठ्या तुटीपर्यंत पोहोचण्याचे धाडस केले आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

दरम्यान, सरकारला आता अर्थसंकल्पाचे संतुलन टिकवणे अवघड झाले आहे. त्यामुळे राज्यावरील आर्थिक बोजा वाढला आहे. राज्याचे आर्थिक संतुलन ढासळले आहे. यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होतो आहे. एसटी, एससी, ओबीसी यांच्यावर खर्च होणारा पैसा कागदावर दाखवला जातो आणि 31 मार्चला कळते, यावर काहीच पैसा खर्च झालेला नाही. तीच पुनरावृत्ती यावर्षी सरकार करते आहे असे मला वाटते, असे ते म्हणाले.

75 अमृत महोत्सव

आद. कृष्णा बोरकर यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा





: शुभेच्छूक :

स्त्रीभूषण रमाई आंबेडकर, संस्था, नागपूर
भारतीय बौद्ध महासभा, शाखा शांती नगर, नागपूर.
समता सैनिक दल, शाखा-शांतीनगर,नागपूर
जयभीम युवा मंडळ, शांतीनगर, नागपूर
शांती नगर मित्र मंडळी. नागपूर.
ज्ञानविकास उच्च- प्राथमिक शाळा युनिवर्सल कॉन्व्हेंट, शांती नगर,
धम्मदीप बुद्ध विहार उपासक, उपासिका, शांती नगर, नागपूर.

“ हिंसा ही वाईट गोष्ट आहे
परंतु गुलामी ही त्यापेक्षाही वाईट गोष्ट आहे... ”



बहुजन सौरभ संपादकीय

# संविधान पार्कच्या निमित्ताने

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इतकी सुसंबद्ध राज्यघटना बुद्धी चातुर्याने निर्माण केली, पण त्याभोवती काटेरुपी जातीयवादी हे आहेतच. त्यांनी काट्याचे कुंपण करून राज्यघटना निर्मात्याची आशाआकांक्षा अपयशीच करावयाचा चंग बांधला आहे, असेच म्हणणे उचित वाटू लागले आहे. कारण शरीरशास्त्राने सर्वांचे हात, पाय, डोळे, नाक हे एकाच प्रकारचे निर्माण केले आहेत. त्यात कोणताही दुजाभाव निर्माण केला नाही. सर्वांसाठी एकच शरीरचना निर्माण केली आहे. मग या धर्मभेद्यांनी उच्च-नीच असा का भेद निर्माण करावा? ही जातीयता नाही का? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. माणसाने विज्ञानाची कास धरली आहे. प्रत्यक्षात बुद्ध, कबीर, फुले, शाहू, गाडगेबाबा, डॉ. आंबेडकरांनी अनेक सभा, संमेलनातून सांगितले आहे की सर्व मानव एक आहेत ते हाड, मास, रक्त यापासून तयार झाले आहे. मग माणसा माणसात इतका भेद का असा प्रश्न काल ही होता आणि आज ही आहे . जातीय छळवाद दिवसेंदिवस वाढत जात आहे या विरोधात कठोर निर्णय घ्यावा. त्याचबरोबर जात पंचायत निर्णय यावर निर्बंध आहेत पण छुप्या पद्धतीने पंचायत भरविली जाते. काही ग्रामीण भागात बाल विवाह होतात ते थांबले पाहिजे. शासकीय कार्यालयात देवदेवता आणि पूजा पाठ बंद झाली पाहिजे. धर्मनिरपेक्ष सरकारला काळिमा होय. तो धर्मनिरपेक्षतेचा छळवाद होय.

छळवाद दिवसेंदिवस वाढत आहे. हे सत्य आहे. सर्विहसच्या ठिकाणीही महिला आणि इतर अन्य लोकांना त्रास दिला जातो, याचा सारासार विचार तर यंत्रणा कुचकामी ठरल्या सारखी झाली असे लोकशाही असून ठेकशाही अशी खुली चर्चा सुरू झाली आहे. सर्वांना न्याय मिळवून देणारे सरकारच नाही अशी लोक भावना निर्माण झाली आहे. विरोधी पक्षासोबत चर्चा होत नाही सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी लोक प्रश्नावर चर्चा केलीच पाहिजे. असे होत नाही तर भयभीत वातावरण आहे. झुंडशाही पुढे पोलीस यंत्रणा मोकळी नाही अशी ही खुली चर्चा आहे. पोलीस आणि न्यायव्यवस्था या स्वायत्त संस्था आहेत. संविधानाने अधिकार दिले पण अधिकार लोकांपर्यंत जात नाही. गरिबांचा कोणी वाली पाहिजे . डॉ. बाबासाहेबांच्या सारखे नवे नेतृत्व पुढे यावे . गावोगावी आणि प्रत्येक शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रेरणादायक पुतळे आहेत. हे पुतळे बोलतात, संवैधानिक अधिकार आणि कर्तव्ये यांचे पालन करा. लोकहिताचे कार्य करा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर देव नाहीत तर ते महापुरुष, महानायक आहेत. नुकतेच नागपुरात लॉ कॉलेज चौक नागपूर येथील शासकीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या परिसरात संविधान पार्कचे उदघाटन भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते झाले. ही आनंदाची बाब आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा संविधान पार्कमध्ये आहे. ते संविधानाचे शिल्पकार होते. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या कार्यकाळात देशहित आणि वंचित उपेक्षित घटकांना न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे. लोक त्यांच्याकडे मोठे आशेने बघत आहे. डॉ. बाबासाहेबांनंतर गोरगरिबांना पोशिंदाच राहिला नाही. कारण इतक्या अन्यायकारक घटना घडतात की, त्याचा जाब विचारण्यास कोणीच धजावत नाही, कुणीच उठाव करीत नाही. मग अशा अन्यायकारक घटना घडत असताना प्रतिकार होत नाही. पुढारी नाहीच नाही पण हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच प्रतिष्ठित लोक आहेत, ते त्यांच्याच ऐश्वर्यात दंग आहेत, त्यांना

समाजाकडे पाहण्यास वेळच मिळत नाही का? त्यांचा बंगला, गाड्या त्यांना सुखसोयी मिळाल्या. त्यांना वाटते की, आपले कुटुंब तर सुरक्षित आहे ना? भोपळ्यात बी खुशाल. अशी स्थिती झाली आहे . नाहीतरी कान असून बहिरे व डोळे असून आंधळे, असेच म्हणावे लागेल. आज जे आर्थिकदृष्ट्या परिपूर्ण आहेत, सुखी आहेत, तर हे तुम्हाला कुणामुळे मिळाले? ज्यांनी तुमच्या सुखासाठी, जीवनाचे वाळवंट केले, ज्यांनी परिस्थितीचे चटके सहन करून मानापानाचा विचार केला नाही, ज्यांनी चैनीचा उपभोग घेतला नाही, अशा आपल्या डॉ. बाबासाहेबांचा विसर पडला. त्यांच्या कर्तृत्वाचा व त्यागाचा, उपकाराचा विसर पडला आहे. त्यांच्या उपकारांची परतफेड म्हणून तुम्ही जनतेकडे लक्ष दिले पाहिजे. जनतेच्या अडीअडचणी विचारपूर्वक सोडविल्या पाहिजेत. तरच तुम्ही डॉ. बाबासाहेबांचे सच्चे कार्यकर्ते म्हणून पात्र ठराल. अन्यथा येणारी नवीन पिढी तुम्हाला शिव्याशाप देईल. नदीचे पाणी वर्षभर वाहत नाही तसा पैसा तुमच्याकडे कायम राहील का ? जात ही कायम राहील कारण ती धर्मानुसार आली आहे ती कधीच दूर जाणार नाही आणि नष्ट होणार नाही. जातीचा छळ पण नष्ट होणार नाही. पण हा प्रकार थांबविण्याची ताकद संविधानात आहे. संवैधानिक संस्थाना आपले कार्य प्रामाणिकपणे करावे लागेल तरच लोकांचा न्यायव्यवस्थेवर विश्वास राहील. मा. सरन्यायाधीश भूषण गवई कमी वेळात अधिक न्याय मिळवून देतील अशी अपेक्षा आहे. ■ ■

# आंबेडकरी चळवळीतील कर्मठ नेता कर्मवीर हरिदास आवळे बाबूजी

**परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानव मुक्तीची चळवळ आरभिली अनेक तरुणानी घरावर तुळशीपत्र ठेवून चळवळीला वाहून घेतले. अशा निष्ठावंत सिद्धांतवादी लोकशाहीचा पुरस्कार करणारे हरिदास आवळे होत. अस्पृश्य लोकांवर होणारे अन्याय अत्याचार या विरुद्ध संघर्ष करून पिडीत समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी रात्र दिवस एक करून अत्याचार ग्रस्ताना दिलासा देऊन त्यांना हिम्मत देत असत.**



आंबेडकरी विचार शेवटच्या माणासा पर्यंत पोहचवून त्यांच्यात जनजागृती करून स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित करून संघटना बांधण्याचे काम केले. सतनामी लोकांमध्ये आंबेडकरी विचारांची पेरणी करून त्यांना विषमतावादी व्यवस्था विरूद्ध लढण्याचे बळ दिले. सतनामी समाज आंबेडकरी चळवळीचा भाग झाला. समता सैनिक दलात तरुणांना समाविष्ट करून शिस्त संघटनेप्रती निष्ठा अन्याय अत्याचार ह्या विरूद्ध आवाज बुलंद करून शोषक वर्गावर वचक बसविण्यासाठी सैनिकांना प्रवृत्त केले. प्रस्थापित लोकांत धाक निर्माण झाला. आंबेडकरी चळवळ तत्वावर आधारित असावी असा आग्रह आवळे बांबूचा होता त्यासाठी कोणत्याही प्रकारचा त्याग करण्याची तयारी असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला रिपब्लिकन पक्ष लोकशाही सिद्धांतानुसार चालावा. हा प्रश्न रेटून नेतृत्वावर दबाव निर्माण केला. परतु रिपब्लिकन पक्ष सिद्धांताप्रमाणे न चालता हुकुमशाहीनुसार चालण्यास सुरुवात केली. त्यांचा परिणाम आज रिपब्लिकन पक्षाचे अनेक भागात विभाजन झाले असून आपले अस्तित्व धोक्यात घातले. ज्यांनी शासन व्यवस्थेवर दबाव निर्माण करून आपली विरोधीपक्ष म्हणून ओळख निर्माण केली होती. शासन घाबरून युती करण्याचा डाव फेकला त्याला रिपब्लिकन नेतृत्व बळी पडला. सत्तेच्या सहाय्याने कार्य करण्याचे सुरवात केली. त्यामुळे संघर्ष करण्याची भूमिका मागें पडली. आज प्रत्येक कार्यकर्ता शासनात कशा वाटा मिळेल याच भावनेतून कार्यशील असतो. त्यामुळे रिपब्लिकन पक्ष कमजोर होऊन आखरी श्वास घेतना दिसतो. शोषित समाजाचे प्रश्न आवासून उभे आहेत त्याविरुद्ध संघर्ष करण्याची वृत्ती दिसत नाही.तर तडजोडीचे राजकारण केल्या जाते. आवळे बांबू जी हयातभर अन्याय अत्याचार विरूद्ध संघर्ष करून सत्तेच्या मनात धडकी भरविली. रिपब्लिकन पक्ष एकजूट होऊन येथील प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करण्याची भूमिका आवळे बाबूजी ची होती. आज आवळे बाबूजींच्या 110 जन्म दिवसाच्या निमीत्ताने आंबेडकरी चळवळ विखुरली आहे ती एकजूट होऊन समतेचा विचार पक्का होईल या दृष्टिने विचार व्हावा. ■ ■



विनायकराव जामगडे
मो.9372456389



# ओडिशा घटनेने; डोळे पाणावले!

ओडिशा घटनेने; डोळे पाणावले ! इतक्या वर्षानंतरही हा देश तसाच? उद्विग्नता आलीय. डोळे पाणावले. भयंकर राग आला.

ओडिशा, गंजम जिल्ह्यातील ही घटना. अलीकडेच घडलेली. बेचैन करून गेली. सख्ख्या भावांसोबत घडले. एक किलोमीटर अंतरावर दोघेही राहतात. अंधारलेला दोघांचाही निवारा.

गरीबीचे जगणे. ते बोलत होते. भीती भिनलेली दिसली. घाबरून खचून गेलेले. बोलतांना आधी रडायचे.

दलित असणे हा त्यांचा पहिला गुन्हा. सोबत गाय असणे हा दुसरा गुन्हा. गुन्ह्यांची निर्मम 'सजा' मिळाली.

ते सांगत होते. रडतभाकत सांगत होते. लग्नात मुलीला गाय द्यायची असते. ती प्रथा आहे. तेव्हा ते जमले नाही.

आता पहिल्यांदाच मुलगी माहेरी आली. आता बेत केला.

आता ते करावे. बाप सांगत होता. भावाला सोबत घेतले. शेजारच्या गावातून गाय विकत घेतली. ती आणत असतांना .. ! हे संकट कोसळले. तो गुन्हा ठरला. वाटेत लोकांनी अडविले. कोण तुम्ही? ही गाय कशी? गाय तस्करीचा संशय घेतला. आमचे ऐकेचना. एकदम शिक्षा सुनावली. उभे अर्धमुंडण केले. मारले पिटले. वरात काढली. घुटण्यावर चालायला लावले. गवत खायला दिले. ते खावे लागले. रस्त्यात वाहता नाला लागला. नाल्याचे पाणी प्यायला लावले.

शेवटी कशीबशी सुटका झाली. पोलिसात तक्रार झाली. पोलिसांनी उरलेले अर्धे केस काढायची सोय केली. सांगतांना ते हादरत होते. आठवणींनी भयभीत होते. आता कळते, 12 लोकांना यासंबंधी अटकेत घेतलेय.

ते गोरक्षक असल्याचे बोलले जाते. सध्या ओडिशात भाजपचे सरकार आहे. तेव्हापासून असे रक्षणहार बरेच निर्माण झाले आहेत! ■ ■



रणजित मेश्राम
मो. 9890020789

# समता पाक्षिकाची सुरुवात




**'समता' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेले एक वृत्तपत्र आहे. या वृत्तपत्राचे प्रकाशन 29 जून 1928 रोजी झाले. हे वृत्तपत्र डॉ. आंबेडकरद्वारे समाज सुधार हेतू स्थापित संस्था समता संघाचे (समता सैनिक दलाचे) मुखपत्र होते. याचे संपादक म्हणून डॉ. बाबासाहेबांनी देवराव विष्णू नाईक यांची नियुक्ती केली होती.**

पंजाबात भाई परमानंद जातपात तोडक मंडळातर्फे समतेची चळवळ चालवीत असत, तशाच स्वरूपाचे कार्य व्हावे अशी आंबेडकरांची इच्छा होती. समाज समता संघाचा त्यासाठी उपयोग झाला ही. ब्राम्हण ब्राम्हणेतर नावाचे एक पत्र ते सन 1925 पर्यंत चालवीत असत. तो काळ ब्राम्हणेतर चळवळीचा होता व नाईक आपल्या पत्रातून वादाची वास्तव भूमिका निर्भीडपणे मांडीत असत. ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक व धार्मिक बाबतीतील विचारांचा पगडा त्याच्या मनावर होता. बहिष्कृत भारत आंबेडकरांनी बंद केले, पण समता पत्र पुढे चालू राहिले. या पत्राच्या लेखनाची व इतर सर्व जबाबदारी देवराव नाईक व कद्रेकर यांच्याकडे होती. आपले आभार कोणत्या शब्दात मानावे हेच कळत नाही. आपणास 'जनता' पत्राच्या खास अंकासाठी माझी भेट झाल्यावर माझा संदेशच नव्हे तर आर्थिक मदत व त्याहून अधिक काही तरी देण्याची व्यवस्था करेन.

डॉ. आंबेडकर लंडनला जाण्यापूर्वी मुंबईत त्यांना मानपत्र व थैली अर्पण करून त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी उत्तरादाखल बोलताना त्यांनी जनता पत्राची घोषणा पुढील प्रमाणे केली की, 'बहिष्कृत भारत हे आपल्या पाक्षिकाचे नाव असल्यामुळे ते पत्र बरेच लोक घेत नाहीत. आपले म्हणणे लोकांना कळावे हा उद्देश सफल होत नाही, म्हणून त्या पत्राचे नाव 'जनता' असे ठेवले आहे व देवराव नाईक ह्यांच्या संपादकत्वाखाली ते सुरू राहील'. त्याप्रमाणे जनता पाक्षिक 24 नोव्हेंबर 1930 रोजी सुरू झाले. बंद पडलेल्या समता व बहिष्कृत भारतचे वर्गणीदार असलेल्यांना त्यांची वर्गणी संपेपर्यंत जनताचे अंक विनामूल्य पाठवण्यात येत असत व धार्मिक प्रश्न कसाला लावण्याच्या दृष्टीने त्यांनी जनता पत्रात खास लेख लिहिले.

1937 साली डॉ. आंबेडकर यांनी त्यांनीच स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षातर्फे निवडणूक लढविण्यात आली. त्यावेळी जनता पत्राने विशेष प्रभावी कार्य केले. पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर डॉ. आंबेडकरांनी केंद्रीय कायदेमंत्री म्हणून व राज्यघटनेचा मसुदा तयार करणाऱ्या समितीच्या अध्यक्ष म्हणून जी अपूर्व कामगिरी बजावली. तिची माहिती जनता पत्राने जनतेपुढे ठेवली. 19 ऑक्टोबर 1931 पासून जनता पत्र साप्ताहिक झाले व 1956 पर्यंत चालू राहिले. देवराव नाईक यांच्या नंतर भारत कद्रेकर, गणेश सहस्त्रबुद्धे, बी. सी. कांबळे, यशवंत आंबेडकर इत्यादींनी संपादकाची सूत्रे सांभाळली. 1956 साली डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यावर जनता पत्राचे 'प्रबुद्ध भारत' असे नामकरण झाले. पुढे दादा रूपवते, शंकरराव खरात यांनी संपादनाचा भार वाहिला. मधू तांबेकर यांनीही प्रबुद्ध भारताला बरेच साहाय्य केले. ■ ■

**संकलन - मंगेश नामदेव गायकवाड**
पुणे शहर, पेरणेकर

# माझ्या आयुष्यातील 75 वर्ष

आंबेडकरी चळवळीतील मी कृष्णा चिंतामन बोरकर जन्म 1 जून 1950 रोजी झाला. शांतीनगर महानगर पालिका बगीचा जवळ शहीद रोशन बोस्कर चौक नागपूर येथे निवासी आहे. 1968 मध्ये 10वी पास होऊन 1968 ते 1973 युनिवर्सल आयुर्वेदिक कंपनी शांतीनगर नागपूर येथे सेवा करू लागलो. त्यानंतर सरकारी नोकरी-17.10.1973 ते 30.06.2010 पर्यंत सेवा केली. सेवानिवृत्त केंदीय सरकार स्वास्थ योजना नागपूर असा प्रवासात मी अनेकदा संघर्ष केला. वयाच्या चौदाव्या वर्षापासून सामाजिक व धार्मिक कार्यात सहभाग होता. लग्नविधी, नामकरण वाढदिवस इत्यादी कार्यक्रम करू लागले. बुध्दपूजा त्रिशरण, पंचशिल, त्रिरण वंदना, जयमंगल अष्टगाथा महामंगल सुत्त, करणीय मेत्था सुत्त आदी गाथासह पाली भाषा अवगत केली. वयाचा 26 व्या वर्षी 1976 ला प्रथम शांतीनगर वस्तीत 28 प्लॉट या ठिकाणी राहत असताना पंचकमेटीच्या रिकाम्या प्लॉटवर विहाराची निर्मिती करून लोक वर्गणीतुन 12 बाय 19 फुट विटामाती कवेलुचे बांधकाम केले. धम्म दिप बुध्द विहार नामकरण करून संगमनेरची 1 फुट उंच बुध्दमुर्ती ऑक्टोंबर 1976 ला स्थापन केली. 1988 ला विहारातील जागेचा विस्तारीत काम 19 बाय 24 फुट अंदाजे 450 चौरस फुटावर स्लॅपचे बांधकाम केले. त्यात तनमनधनाने तसेच वस्तीतील व बाहेरील लोकांकडून आर्थिक सहकार्य घेऊन विहाराचे पुर्ण काम केले. बुध्द आणि त्यांचा धम्म ग्रंथाचे वाचन सुरू केले तेव्हा अनेक उपासक, उपासिका, बालबालिका सहभागी होऊ लागल्या होत्या. 1969 ला रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार मधुकर बिसन मेश्राम यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले. 1974 ला दुसऱ्यांदा नगरसेवक मधुकर बिसन मेश्राम याना निवडून दिले. ते स्थायी समितीचे अध्यक्ष झाले. रिपब्लिकन नेते बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाची ताकद मोठी होती. वस्तीतील समाजकार्य, धम्मकार्य करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, बुध्द जयंती, धम्मचक्र प्रर्वतन दिन, महापुरूषाच्या जयंती, स्मृती दिन आदी कार्यात पुढे राहुन कार्य केले. 06.12.1979 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिन मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या विशाल मोर्चात शांतीनगर वस्तीतील महीला पुरुषाच्या विशाल मोर्चात सहभागी होऊन त्यात झालेल्या गोळीबारात माझा लहान भाऊ रोशन चितांमण बोरकर शहीद झाला. कांशीरामजी, डि.के. खापर्डे यांच्या काळात बामसेफच्या अधिवेशनाला लखनऊ, अहमदाबाद येथे सहभागी झालो. बहुजन समाज पार्टीच्या लोकसभा विधानसभा, महानगरपालीका निवडणुकीत उमेदवारांना



तनमनधनाने सहकार्य केले.

1999 ला भारतीय बौध्द महासभेच्या श्रामनेर प्रशिक्षणात भाग घेतला होता. मिलिंद बुध्द विहार मिलींदनगर या ठिकाणी प्रथमता श्रामनेर दीक्षा घेऊन 15 दिवस श्रामनेर प्रशिक्षण घेतले. 2003 दुसऱ्यांदा 15 दिवस श्रामनेर प्रशिक्षण घेतले. 2006 मध्ये धम्मचक्र दिनाचे सुवर्ण महोत्सवात श्रामनेर दीक्षा घेतली. 2008 ला दीक्षाभुमीवर श्रामनेर दीक्षा घेतली. 2009 ला भारतीय बौध्द महासभेच्या प्रेक्षनीय स्थळाच्या धम्म सहली मध्ये श्रामनेर दीक्षा घेऊन 17 दिवस सारनाथ बुध्द गया, कपिलवस्तु, वैशाली, लुंबिनी, काठमांडु, कुशीनारा इत्यादी स्थळावर चिवरमध्ये राहून सहभाग घेतला. भारतीय बौध्द महासभेच्या पर्यटन विभागात सहसचिव म्हणून पाच वर्ष धम्म सहल घेऊन जाण्यास सहभागी झालो. भारतीय बौध्द महासभेच्या नागपुरात अनेक धम्म कार्यात सहभागी झालो. धम्म प्रचार प्रसाराचे कार्य करताना वर्षावास काळात धम्म दिप बुध्द विहार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पंचकमेटी बुध्द विहार, न्यु ज्ञानदिप बुध्द विहार, बांगडे प्लॉट, सत्त धम्म बुध्द विहार, जागृतीनगर या चार बुध्द विहारात बुध्द आणि त्यांच्या धम्म या धम्म ग्रंथाचे उपासक, उपासिकासमोर वाचन करून धम्म समजाविण्याचा प्रयत्न केला.

तथागत बुध्द विहार हिवरीनगर येथून सुरू केलेल्या 'चलो बुध्द की और' या अभियांनात उपस्थित राहून कार्यक्रमात सहभाग घेतला. जबलपुर रोड मनसर जवळील पटगोवारी या गावला 2017 ला 30 बाय 50 फुट (1500 चौरस फुट) समता बुध्द विहार (पटगोवारी) विहारांचे कार्य सुरू केले त्यात 14 फुट उंच हॉल व 14 फुट उंच विहार त्यावर 14 फुट उंच स्तुप तयार केला त्याला अंदाजे 35 ते 40 लाख रूपये गावातील राहणाऱ्या समाज बांधवां कडून (रेती, लोहा, विटा, सिमेंट, गिटटी) वास्तू तयार केली त्याचे काम अजुन पूर्ण झाले नाही. ते पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. विहार तयार झाल्यावर त्यात वाचनालय, युपीएसी, एम.पी.एस.सी तसेच इतर परीक्षेचे मार्गदर्शन केंद्र सुरू करावयाचे आहे. अशी मी माझ्या आयुष्यातील 75 वर्ष घालविली आहे. आपल्या सर्वांचे प्रेम असेच राहू द्या ही अपेक्षा आहे.

1985 ला ज्ञानविकास बहुउद्देशिय मंडळाची स्थापना केली. प्रात संस्था अध्यक्ष आहे. संस्थेत तनमनधनाने कार्य बाळवाडी, ज्ञानावेगास उच्च प्रा. उमाळा, युनिव्हर्सल कॉन्वेंट चालवित आहे. शिक्षण प्रचार प्रसाराचे कार्य सुरू आहे. ■ ■

**- कृष्णा चिंतामण बोरकर**

# परदेशी गेले, देशी आले स्वातंत्र्याचे काय ?

देश पारतंत्र्यात होते. गुलाम होते. समाज गुलाम होता. ब्राम्हण गुलाम होते पण उच्च दर्जाचे. त्याची लाज ब्राह्मणवाद्याना वाटत नाही. ते प्रत्येक परकिय राजवटिशी तह करायचे. 'भारतीयावर आमची धार्मिक सत्ता कायम ठेऊन देशावर तुम्ही राज करा.' मान-सन्मानासाठी त्यांनी आपली अब्रु गहाण केली. ही सवय टिकवली. स्वतःच्या ईज्जती सोबत इतर समाजाची इज्जत वेशीवर टांगली. ब्राह्मणांनी भारतीय मोठा समाज कंगाल, गुलाम केला. या समाजाचे स्वातंत्र्याशी काही सोयरसुतक नव्हते. जहाल व मवाळ दोन्ही पक्ष सत्ता मिळण्यासाठी इंग्रजांशी लढले. पण जो समाज ब्राह्मणांचा व प्रक्रियांचा गुलाम होता, जो अजुनही स्वतंत्र नाही; त्याच्या स्वातंत्र्याचे काय? या प्रश्नाचे उत्तर ब्रिटिशाना तसेच ब्राह्मणवाद्याना देता आले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या प्रश्नाचे उत्तर शोधले, देशाला राजकीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक, सांस्कृतिक आर्थिक स्वातंत्र्य अभिप्रेत असल्याचे सांगितलेच नाही तर तशा चळवळी तशी आंदोलने केली. विद्वत्तेचा बळावर आपले म्हणणे समाजाला व इंग्रजांना पटवून दिले. अखेर भारताला राजकीय सोबत सामाजिक स्वातंत्र्य मिळाले. पण स्वतंत्र भारताची सत्ता त्याच कावेबाजांच्या हातात एकवटली. ही शोकांतिक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक स्वातंत्र्यासह राजकीय स्वातंत्र्यासाठी अन्याय, आत्याचार, अंधश्रद्धा, बहिष्कार, गुलामी विरुद्ध लढा पुकारला. पुरोगामी म्हणविणाऱ्या



ब्रिटिशांनी भारतावर राज्य करतांना हिंदू सारखाच उपेक्षितांकडे दुर्लक्ष केला. हे विद्वत्तेचा बळावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटिशांना पटवून दिले. 27 मे 1925 ला महाडच्या लढ्यात मनुस्मृतीने सार्वजनिक दहन करून हिंदूधर्मातील कुथांच्या प्रतिकांचा नंगानाच जगासमोर आणला. नाउम्मेद, उपेक्षित, नग्न, भटके, जाती-जमाती, इमाव समाजात नवचैतन्याची उर्जा भरली. त्यांना जेसंगठीत केले. सामाजिक नापीक जमिनीत 'शिकवा, संगठीत व्हा, संघर्ष करा'. ची पेरणी केली. भ.बुद्धाच्या 'अत्त दिप भवं' या महामंत्राने मृतप्राय समाज जीवंत केला. भारत सरकारच्या पक्षपाताचे उदाहरण - 2025 चा आर्थिक अहवालात राष्ट्रीय उत्पन्नाची केलेली तरतूद जाहीर झाली. सरकारने समाज विकासासाठी 1250 लाख कोटी संपत्ती तीन (3) भागात खालील प्रमाणे विभागली. त्यात केलेला पक्षपात उघड आहे. पहिलागट - उच्च समाजाच्या 13-14 कोटी लोकसंख्येसाठी 962.5लाख कोटी खर्चाची तरतूद केली. दुसरागट-मध्यम लोकांच्या. 20-30 कोटी लोकसंख्येसाठी 175 लाख कोटी खर्चाची तरतूद केली. व तिसरागट-निम्न समजल्या जाणाऱ्या लोकांच्या सुमारे 100 कोटी लोकसंख्येचा. यासाठी 75 लाख कोटी खर्चिची तरतूद केली. या असमान, प्रमाण रहित तुघलकी नियोजनाने देशातील शेतमजूर, झोपडपट्टीवासी, असंघटित मंजूर, कामगार, भूमिहीन, गरीब 80 कोटी समाज मूलभूत गरज पूर्ती पासून वंचित राहिला. या विषमतेवर वैदिक, ब्राह्मणी हिंदू धर्माचे वर्चस्व आहे. ही विषमता स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी काळात शिगेला पोहोचली. विशेषेकरून ब्राह्मणवाद्याना खूश करण्यासाठी खूद केंद्र सरकारने तिसऱ्या गटाला गुलाम ठेवण्यासाठी त्यांच्या चळवळी संपविल्या. त्यांच्या मार्गात लोखंडी खिळे ठोकले. त्यांच्या हिताचे घटना दत्त कायदे गोठवले. 5 किलो राशन, वर्षात 1-2 महिने रोजगार हमी, नावापुरती किसान सन्मान निधी, लाडकी बहिण, फुकट सिलेंडर, निवडणूकांच्या तोंडावर मतासाठी पुढे केल्या. उपकाराच्या नावावर सामान्य जनतेची फसवणूक केली. याला स्वातंत्र्य नाव दिले. देशाचे संविधान निर्माण करण्याची पात्रता संविधान निर्मितीच्या वेळेस देशाने डॉ. बी.आर.आंबेडकरात अनुभवली. सर्व पुढा-यांच्या सम्मतीने डॉ. बी. आर.आंबेडकरांनी भारताचे विश्वमान्य संविधान निर्माण केले. ब्रिटीश काळात न्यायाधीश राहिलेले बी. एन. राव संविधान सभेचे सल्लागार; एस.एन.मुखर्जी सहसचिव; सचिवालयाचे आलेखक आणि कर्मचारी यांचेही संविधानाला सहकार्य लाभले. **क्रमशः** ■ ■

**विद्या व्यासंग**



प्राचार्य भाऊ वासनिक
9423606064

# आंबेडकरी पत्रकार भा.शि. बाभळे

**डॉ. बाबासाहेबांच्या झुंजार पत्रकारितेची दोरी आयुष्यभर हाती धरणारे, अभ्यासू लेखक, विचारवंत, प्रेमळ, सद्गुणी व्यक्तिमत्त्वाचे धनी आणि डॉ. बाबासाहेबांचा सहवास लाभलेले थोर विदर्भपुत्र भा. शि. बाभळे यांची आज, 1 जुलै 2025 रोजी 96 वी जयंती त्यानिमित्त...**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, 'कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्रांची आवश्यकता असते. चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते.' हे गृहीत धरून दीनदुबळ्यांचा आवाज शासन आणि जनतेपर्यंत पोहोचविणे हा मूळ उद्देश डोळ्यांसमोर ठेवून समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी 31 जानेवारी 1920 रोजी 'मूकनायक' या साप्ताहिक वृत्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला. या पत्रकातून डॉ. बाबासाहेबांनी प्रथमच पददलितांच्या समस्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या महाप्रयाणानंतर तोच वारसा त्यांच्या विश्वासू, निष्ठावान शिलेदारांनी आपापल्या परीने प्राणपणाने जोपासला. त्यात विदर्भपुत्र भा. शि. बाभळे यांचे नाव अतिशय गौरवशाली आहे.

बाभळे यांचा जन्म सिंदी रेल्वे ता. जि. वर्धा येथे 1 जुलै 1929 रोजी झाला. वडील भागवत शित्रूजी बाभळे हे यशस्वी व्यावसायिक ठेकेदार होते. 'खेडी सोडा शहराकडे चला, आपल्या उद्धारासाठी शिक्षणाची कास धरा' हा डॉ. बाबासाहेबांचा संदेश गाव-खेड्यापर्यंत पोहचला होता. याचा परिणाम तरुण वर्गावर पडला. बाभळे यांनी आठवीनंतर शिक्षणासाठी वर्धेतील कॅडक हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. दहावीची परीक्षा उत्तीर्ण करून गोविंदराव सक्सेरिया कॉलेजला प्रवेश घेऊन एलएलबी केले. फाईन आर्टचा कोर्स केला. ते उत्तम चित्रकार होते. त्यांनी चितारलेले बुद्धाचे चित्र आजही त्यांच्या घरी पहावयास मिळते. 1952 साली बाभळे यांनी शाळा आणि वसतिगृह सुरू केले. रात्री नाईट क्लासला शिकवणी वर्ग घेण्यासाठी आनंद निकेतन नावाने आर्ट शाळा 'बजाज मंदिर'मध्ये सुरू केली. याच काळात 'सिद्धार्थ जगत' नावाचे पाक्षिक सुरू केले. डॉ. बाबासाहेबांनी श्रीलंकेत जागतिक बौद्ध परिषदेप्रसंगी दिलेले भाषण छापून पहिला अंक






प्रसिद्ध केला. एकदा बोधी मंडळाने औरंगाबादला त्यांचे व्याख्यान ठेवले होते. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आणि 'युगयात्रा'कार म. भि. चिटणीस यांच्या उपस्थितीत त्यांनी भाषण केले. विदर्भातून प्रकाशित होणाऱ्या अनेक वृत्तपत्रातून नियमितपणे लेख लिहून त्यांनी प्रबोधनाचे महान कार्य केले. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात', 'पुनर्जन्म घेऊन डॉ. आंबेडकर आज आले तर...', 'मी पाहिलेली डॉ. आंबेडकरांची सामाजिक क्रांती', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचा धम्म', 'डॉ. आंबेडकर यांचेकडून ऐकलेला बुद्धधर्म', 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर' आणि 'प्रजासत्ताक डॉ. आंबेडकरांची देण' हे त्यांचे लेख प्रचंड गाजले. सोबतच 'डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात', 'डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत धर्म आणि राजकारण', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मानवमुक्तीचा संघर्ष', 'जातीभेद समस्या' आणि 'विवाह पद्धती' ही पुस्तके लिहिली. आंबेडकरी चळवळीची वर्धेत खऱ्या अर्थाने सुरुवात 1954 साली झाली. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकसभेच्या निवडणुकीकरिता भंडाऱ्याला आले होते. त्यावेळी बाभळे यांनी पुलगावच्या बौद्ध विहाराचा कोनशिला समारंभ व नाचनगावच्या 'सिद्धार्थ वाचनालया'च्या उद्घाटनासाठी डॉ. बाबासाहेबांना 25 एप्रिल 1954 रोजी आमंत्रित केले होते. 1955 साली बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्यासोबत औरंगाबादला डॉ. बाबासाहेबांना ते भेटले. चर्चेत सहभागी झाले. त्या संस्मरणीय प्रसंगाची आठवण सांगताना बाभळे म्हणाले, ''बाबांनी मला आपल्याजवळ बोलावून खुर्चीवर मायेने बसविले. ज्ञानसूर्याच्या पायाशी मी भिडलो... त्यांचे प्रत्यक्ष दर्शन माझ्या डोळ्यात मावत नव्हते. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. खाली वाकून त्यांच्या चरणावर डोके ठेवले. त्यांचा हात माझ्या पाठीवरून फिरला. त्या स्पर्शाने पाठीवर एक अदृश्य ठसा कायमचा कोरला गेला.''बाभळे शेड्युल कास्ट फेडरेशन व समता सैनिक दलाचे वर्धा जिल्ह्यात अध्यक्ष व मार्गदर्शक होते. गरीब लोकांकरिता अजंता बॅकवर्ड क्लास सहकारी गृहनिर्माण संस्था सुरु करून अल्प किंमतीवर प्लॉट देऊन 'सिद्धार्थनगर' वसाहत निर्माण केली. पुढे त्याचे नामकरण 'भीमनगर' करण्यात आले. सिलिंगच्या जमिनी गरजू लोकांना मिळवून देण्यासाठी आंदोलने केली. गरजू महिलांसाठी 'रमाबाई महिला मंडळा'ची स्थापना केली. नवबौद्धांवर अन्याय दूर करण्यासाठी कायदेशीर नि:शुल्क सहाय्य केंद्र सुरू केले. आंतरजातीय विवाह मंडळाची स्थापना केली. बालवाड्या, शाळा, हॉस्टेल सुरू केले. चंद्रपूरला डॉ. आंबेडकर कॉलेजच्या स्थापनेसाठी महत्त्वाची भूमिका निभावली.

केळझरचे बुद्धविहार त्यांच्याच प्रेरणेने साकार झाले. बाभळे गुरुजींचे वर्धा येथील घर आंबेडकरी चळवळीचे प्रमुख केंद्र बनले होते. 29 वर्षापूर्वी (24 एप्रिल 1996) त्यांच्या सहवासात एक दिवस घालविण्याचे मला सद्भाग्य लाभले. त्यांनी माझा यथोचित आदरसत्कार केला. डॉ. बाबासाहेबांच्या सहवासातील हृद्य आठवणी सांगताना त्यांच्या पाणीदार डोळ्यातून सारखे अश्रू ओघळत होते हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे. सायंकाळच्या सुमारास निरोप देताना त्यांनी मला आंबेडकरी साहित्याच्या शिदोरीसोबत 'सिद्धार्थ जगत' साप्ताहिकाचे अंक मोठ्या आपुलकीने बांधून दिले. त्यांनी मला भेट दिलेल्या पुस्तकांनी आणि त्यांच्या टपोरेदार स्वाक्षरीने माझ्या संग्रहाची शोभा निश्चितच वाढविली आहे याचा मला सार्थ अभिमान आहे. अशा या प्रतिभावंत पत्रकाराचे 24 मार्च 1998 रोजी परिनिर्वाण झाले. 96व्या जयंतीनिमित्त पावन स्मृतीला विनम्र अभिवादन. ■ ■



मिलिंद मानकर
मो. 8177866397

# दानाचे 25 वे वर्धापन वर्ष




विद्या विलास सुटे यांचे रामटेक मनसर 'ओरिकाता शिझुए वृध्दाश्रमास' दानाचे 25 वे वर्धापन वर्ष. रामटेक येथील नागार्जुन विहारासमोर ओरिकाता शिझुए वृद्धश्रमात आयुष्यमती विद्या विलास सुटे यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने सतत 25 वर्ष येथील 30/32 वृध्द महिला, पुरुष यांना जिवन आवश्यक वस्तुचे दान देत आहेत. मी स्वतः गेल्या तिन वर्षांपासून या कार्यक्रमात उपस्थित राहत आहे. ओरिकाता शिझुए वृध्दाश्रम जपान या देशातील सन्मानित आरिकाता मॅडम व त्यांच्या पतीने हे वृध्दाश्रम करता 8 एकर जमिन दान दिली. त्याच्या दानातुन आपले धर्मगुरू नागार्जुन सुरई संसाई यांच्या मार्गदर्शनाखाली वर्ष 1999 ला हे वृध्दाश्रम तयार करण्यात आले व त्यांचे उद्घाटन तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री ग्यानी झैलसिंग यांचे हस्ते व आदरणीय भंते नागार्जुन सुरई संसाई उपस्थितीत झाले. या वृध्दाश्रमाचे व्यवस्थापन काही वर्ष भिख्खू संघाने केले त्यानंतर आयुष्यमान कैलास रामटेके हे व्यवस्थापण सांभाळत आहेत. ते सेवानिवृत्त सनदी अधिकारी नानक रामटेके यांचे बंधु आहेत. यावर्षी विद्याताई सुटे, बजाज नगर नागपूर यांच्या या 25 व्या वर्षातील दानाच्या कार्यक्रमात माननीय भि. म. कौशल, सेवानिवृत्त संचालक माहीत व प्रसारण महाराष्ट्र शासन, अशोक गेडाम सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी, सेवकदास फुल माळी मुख्य कार्यपालन अधिकारी खादी ग्रामोद्योग मंडळ मुंबई, भाग्यवान कांबळे सेवानिवृत्त शिक्षक अधिकारी वर्धा, धर्मेश प्रसेनजित सेवानिवृत्त तहसीलदार रामटेक, अधिवक्ता हेमंत मेश्राम, पवन मेश्राम, पाल कांबळे सेवानिवृत्त शिक्षक, दयानंद कांबळे भुमी अभिलेख अधिकारी सेवानिवृत्त उपस्थित होते कार्यक्रम सामुहिक बुद्ध वंदनेनंतर, दानाचा व भोजनाचा कार्यक्रम करुन संपन्न झाला. ■ ■


धर्मेश प्रसेनजित
मो.९८५०३९९५०६


# सामाजिक कार्यकर्ती सखी रंजना लोखंडे

**उंटखाना, नागपूर येथे वास्तव्य करणारी रंजना लोखंडे शासकीय वैद्यकीय कॉलेज, येथे बालरोग विभागात परिचारिका प्रमुख म्हणून कार्यरत राहिली.**

दि. 30 जून 2025 रोजी तिची सेवानिवृत्ती आहे. रंजनाची ओळख परिचारिका सुरेखा ताकसांडे सोबत एका पिकनिक प्रवासात झाली. त्यानंतर वामन मेश्राम यांच्या बामसेफच्या अधिवेशनात चंद्रमणीनगर येथील संतशिरोमणी सभागृहामध्ये भेट झाली. तेव्हाच रंजनाचा हलकासा परिचय झाला होता. 2019 ला कोरोना काळात काही बामसेफ पदाधिकारी, ईश्वर कडबे, गणेश पाटील, सुनंदा गायकवाड, जया कलिहारी, रंजना लोखंडे, सुनिता रामटेके, सुरेखा ताकसांडे या बामसेफ कार्यकर्त्यांनी वर्गणी गोळा करून धान्य व किराणा लोकांना चंद्रमणीनगर, कौशल्यानगर, बजरंगनगर व इतर ठिकाणी वाटप केले. त्यावेळच्या कोरोना काळात सखी रंजना लोखंडे हिची ओळख झाली. त्यानंतर डॉ. सिद्धार्थ कांबळे, संध्या राजुरकर, विलास गजभिये, ज्ञानेश्वरदादा रक्षक, सुनंदा गायकवाड आम्ही सर्वांनी पुस्तकवाचन या उपक्रमाला सुरवात केली असता काही पुस्तके वाचुन नंतर 'मिलिंद प्रश्न' वाचण्यास सुरुवात केली होती. तेव्हाच सुनिता रामटेके हिला या उपक्रमात सहभागी केले होते. त्यानंतर दर रविवारी बुद्धिस्ट संडे स्कूलला सकाळी नऊ वाजता वंदना, ध्यान साधना, वाचन व इतर धार्मिक, सामाजिक चर्चा करण्यात डॉ. सिद्धार्थ कांबळे, ईश्वर रामटेके, संध्या राजुरकर, ताराबाई पाटील, मुक्ता गावंडे, सीमा थुल सुनंदा गायकवाड, जया कलिहारी, रंजना लोखंडे, सुनिता रामटेके, मीना सूर्यवंशी, रत्ना मून व इतर सर्वांच्या सहभागाने बरेचसे कार्यक्रम झाले. परिवर्तन विचार मंचचे अध्यक्ष विलास गजभिये, प्रा. भीमराव गायकवाड यांच्या परिवर्तन विचार मंचच्या संमेलनात सर्व मैत्रिणीचा सहभाग होता. अनेक कार्यक्रमात हातभार असायचा. गजल गायक संगीत गुरु अनिल भगत यांच्या 'आविष्कार अकादमी' संगीत क्लासला सुरुवात झाली. संगीत क्लासची पहिली विद्यार्थी मी सुनंदा गायकवाड होती. त्यांचा मला गर्व वाटत होता. कालांतराने संगीत विद्यार्थी म्हणून रंजना लोखंडे सुद्धा यामध्ये सहभागी झाली. सर्व मैत्रिणी होऊन भीम गीत, बुध्द गीत व हिंदी-मराठी गीतांजलीच्या माध्यमातून




बऱ्याचशा कार्यक्रमाचा लाभ घेता आला होता. तेव्हाच 'दैनिक बहुजन सौरभ' वृत्तपत्राची सुरुवात झाली होती. माझा सहभाग 'दैनिक बहुजन सौरभ' मध्ये पहिली महिला भागीदार म्हणून समावेश झाला. त्यानंतर हळूहळू काही मैत्रिणीसोबत रंजना लोखंडे सुद्धा 'दैनिक बहुजन सौरभ' वृत्तपत्राची दानदाती झाली. रंजना लोखंडे हि दान पारमितासाठी तत्पर असते. 'पे बॅक टु सोसायटी' हि विचारधारा लक्षात घेऊन सविधान जागर पथनाट्य मधे सहभाग नोंदविला.

सखी सोबतीने पहिल्या प्रयोगाची सुरवात 26 नोव्हेंबर 2022 संविधान दिना-निमित्य संविधान चौक येथे सुरवात झाली. लेखक गीतकार डॉ. एम. एस. जांभुळे, दिग्दर्शिका डॉ. विना राऊत व सर्व कलावंत आतापर्यंत एकूण 134 प्रयोग सादर झालेत. सखी रंजना निवृत्तीनंतर पुढे पण तुझ्या हातून धार्मिक, सामाजिक कार्य गतिमान राहो व तुझ्या हाताला यश येवो.

रंजनाच्या आयुष्यात नेहमीच आनंद राहो. सदैव हसत खेळत राहून पुढे ही सखी रंजना लोखंडेचा मैत्रीचा सह-प्रवास राहून पुढील वाटचाल तिला तिच्या मनाप्रमाणे अनेक कार्यात सहभागी राहून उत्तम कार्य, दान पारमिता, मैत्री भावना, दिप प्रमाणे उजळत जावो व हर्ष उल्हासदायक राहो अशी माझी मंगलकामनासह सदिच्छा सखी रंजनाच्या पाठीशी सदैव राहो. ■ ■


**सखी - सुनंदा गायकवाड, नागपूर**


# आयुष्य एक रंगमंच

**अनंतायन**




ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677


आयुष्यभर त्या पतीपत्नीने मोलमजूरी केली पण आपल्या एकुलत्या एक लेकाला उच्चविद्याविभूषीत केले. तो एक मोठा अधिकारी म्हणून नावारूपाला आला. त्याच्याच तोडीच्या एका मुलीशी त्याचा विवाह झाला. लग्नानंतर त्याच्या पत्नीला ऐकेकाळी मोलमजूरी करणाऱ्या त्याच्या अशिक्षित आई-वडीलांची लाज वाटायची. त्यामुळे घरात रोज खटके ऊडायला लागले. शेवटी त्याची पत्नी म्हणाली 'आता ह्या घरात एक तर तुझे आई-वडील राहतील किंवा मी राहील. निर्णय तुला घ्यायचा आहे.' पत्नीच्या आहारी गेलेल्या मुलानेही आपल्या आई-वडीलांना वेगळे राहण्याचा इशारा दिला. आई-बाबा गप्प राहीले. आवश्यक ते सामान सोबत नेण्याची तयारी सुरू असतांना त्यांची आई त्यांच्या वडीलांना एकांतात म्हणाली 'चला! आपला येथील मुक्काम संपला. आता आपण काहीही सांगितले तरी आपल्या म्हणण्याला कवडीचीही किंमत नाही. कारण माणसांचे शब्द बोलत नसतात, बोलते ती वेळ. जोपर्यंत तुमची कुणाला तुमची आवश्यकता असते तोपर्यंतच तुमची किंमत असते. तुम्ही मनात हा विचार चुकुनही आणू नका की पुढे आपले काय होईल कारण आपण आता ह्या विचाराच्या पुढच्या वळणावर उभे आहोत. माणूस तेव्हाच अधिक कणखर अन् मजबूत होतो जेव्हा त्यांच्याजवळ गमावण्यासाठी काहीही उरलेले नसते. ही गोष्ट स्पष्ट आहे की जेव्हा पाडणारे आपलेच असतात तेव्हा तोल सावरणे कठीण असते पण अशावेळी आपण मनाला हे समजून सांगायचे असते की जसे ते बदलले तसे आम्हीही आता स्वतःला नक्कीच सावरू 'त्यावर वडील म्हणाले' तु म्हणतेस ते शंभर टक्के खरे आहे. आयुष्याने आपल्याला शिक्षा तर ठोठावली पण आपला गुन्हा काय हे मात्र कळवले नाही. दुःख फक्त तेच देतात ज्यांना आपण आपले समजून हक्क देतो. नाहीतर परकी किंवा अनोळखी व्यक्ती साधा धक्का जरी लागला तरी क्षमा करा! म्हणतात. खरेच काळाने आपल्याला खुप काही शिकवले पण वाईट ह्याचेच वाटते की हे सर्व शिकवायला त्याने खुप वेळ लावला. हरकत नाही! मृत्यू हे आयुष्याचे अखेरचे ठिकाण आहे. चल!

आनंदाने प्रवासाची नव्याने सुरूवात करू या! तुला आठवते का ? रहीमचाचा नेहमी एक शेर म्हणायचे

'शून्य नहीं है जिवन मेरा, हम भी रण में लडे है ।
बिखर जाती है दूनिया जहां, वहां हम आज भी खडे है॥

हे ही काही कमी नाही. आपण दोघे एकत्रीतपणे वाटचाल करीत आहोत.

हर एक उम्र गुजरकर पुरानी हो जाती है ।
हर जिंदगी आहिस्ता आहिस्ता कहानी हो जाती है ॥

आयुष्याच्या रंगमंचावर प्रत्येकजण आपली भूमिका पार पाडत असतो. शेवटी लेखकाने जशी पटकथा लिहिली असेल त्याप्रमाणेच आपल्याही आपले पात्र साकारावे लागणार आहे'. ■ ■

बहुजन सौरभ

# बोरघाटे दाम्पत्य सोबतच सेवानिवृती: एक दुग्धशर्करायोग

*डॉ. विजय भानूजी बोरघाटे व सुनीता विजय बोरघाटे हे दाम्पत्य ह्या जून महिन्यात सेवानिवृत्त झाले आहे, त्यांची निवृत्ती 30 जून 2025 ला एकाच वेळेस सेवानिवृत्ती होऊन दुग्धशर्करायोग झाला आहे.*

डॉ. विजय बोरघाटे हे वी. एन. आय. टी., नागपूर येथून प्राध्यापक व विभाग प्रमुख, इलेक्ट्रिकल विभाग म्हणून 40 वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत.

ठाठूरवाडा, काटोल येथे लहानपण आणि नबीरा महाविद्यालयात 12 वी पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे 1982 मध्ये बीई इलेक्ट्रिकल केले. त्यानंतर वी.आर.सी.ई. (वी.एन.आय.टी.) नागपूर मधून एम. टेक. पदवी प्राप्त केली. चंद्रपूर येथे उपअभियंता म्हणून एम.एस.इ.बी. मध्ये रुजू झाले.




1984-85 मध्ये त्यांनी महत्त्वाची आय.ई.एस. परीक्षा उत्तीर्ण केली, व त्यांना केंद्र सरकार इलेक्ट्रिकल अथॉरिटी मध्ये उच्च पदावर नियुक्ती पत्र प्राप्त झाले. त्यांचे वडिल डॉ. भानूजी बोरघाटे महाराष्ट्र स्वास्थ सेवा येथे कार्यरत असल्याने त्यांना गडचिरोली येथील दुर्गम भागात काम करावे लागत असे. त्यांच्या आग्रहाखातर घरात सर्वात मोठा असल्याने बहिणभावांचे शिक्षण आणि सामाजिक कार्याची आवड त्यांनी वीआरसीई (वी.एन.आय.टी.)नागपूर येथे 1985 मध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून ते रूजू झाले. डीन, विभाग प्रमुख, एडमिशन कमिटी चेअरमन, पीएचडी मार्गदर्शक आणि इतर महत्वाच्या पदांवर त्यांनी काम केले आहे.

मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय आणि इतर विद्यार्थ्यांना एडमिशनसाठी यथोचित मार्गदर्शन केले. सेवेत असतांना मागासवर्गीय प्राध्यापकांवर होणाऱ्या त्यांच्या मार्गदशनाखाली आजयातगत 8 ते 9 विद्यार्थ्यांना पी.एच.डी. प्राप्त झाली आहे, आणि कित्येक आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

डॉ. विजय बोरघाटे यांनी बानाई म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेशनल इंजीनियरिंग एसोसिएशन नागपूरच्या सुरुवातीपासूनच्या जडण-घडणात 1988 पासून फार मोठा वाटा उचलला आहे. सुरवातीला कोषाध्यक्ष म्हणून कित्येक वर्षे त्यांनी काम पाहिले आणि बानाईची उर्वेला कॉलनी मधील सुंदर वास्तू निर्माण झाली.

2010 मध्ये त्यांनी अध्यक्ष म्हणून काम पाहिले आणि तत्कालीन बुद्ध महोत्सव यशस्वी करून दाखवला.

आजतायगत ते बारावी झालेल्या विद्यार्थ्यांना इंजीनियरिंगच्या एडमिशन-साठी मार्गदर्शन करत असतात आणि कित्येक सामाजिक संस्थेची ते जुळले आहेत. त्याचे पुत्र आणि स्नुषा यश बोरघाटे, श्वेता यश बोरघाटे दोघेही फोर्ड कंपनी, डेट्रॉइट, मिशिगन, अमेरिका येथे कार्यरत आहेत आणि कन्या इशिता बोरघाटे ही बी.ई. झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत अभ्यास करत आहे. त्यांचे लहान बंधू डॉ. संजय बोरघाटे हे देखील वी.आर.सी.ई. (वी.एन.आय.टी.) नागपूर येथे 1998 पासून सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. सुनिता विजय बोरघाटे ह्या डॉ. विजय बोरघाटे यांच्या सुविद्य पत्नी व पूर्वाश्रमीच्या सुनिता अजाबराव भगत, ॲड.. अजाबराव संभाजी भगत यांच्या कन्या ह्या शासकीय विज्ञान संस्था, नागपूर येथून रसायनशास्त्रात एम.एस.सी. झाल्यानंतर बी.एड. करत असतांना त्यांचा विवाह विजय बोरघाटे यांच्याशी 1990 मध्ये झाला आणि 1991-92 मध्ये न्यू इंग्लिश स्कूल आणि जूनियर कॉलेज, काँग्रेसनगर मध्ये कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक म्हणून रुजू झाल्या. न्यू इंग्लिश स्कूल महाल शाखा येथे 2023-24 मध्ये उपमुख्यधापिका म्हणून काम पाहिल्यांनंतर जून 2024 मध्ये न्यू इंग्लिश स्कूल आणि जूनियर कॉलेज, काँग्रेसनगर येथे मुख्याध्यापिका म्हणून रुजू झाल्या. 33 वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर 30 जून 2025 ला सेवानिवृत्त झाल्या आहेत. बहुजन सौरभचे स्तंभ लेखक डॉ. सुनिल भगत यांच्या त्या भगिनी आहेत. डॉ. विजय बोरघाटे व सुनीता बोरघाटे ह्या दाम्पत्यचा सेवानिवृत्ती नंतरचा काळ हा आरोग्यवर्धक आणि सुखसमाधानाचा जावो अश्या भावना देवयानी भगत, डॉ. सुनिल भगत, शोभा बोरघाटे, कुमार बोरघाटे, डॉ. संजय बोरघाटे, ज्योत्स्ना बोरघाटे, अजय बोरघाटे, डॉ. माधुरी बारसागडे, डॉ. वासुदेव बारसागडे, डॉ. महेंद्र भगत, डॉ. मिलिंद भगत, डॉ. भीमराव उमरे, संघमित्रा मेश्राम, डॉ. संध्या साखरे, डॉ. विशाखा भगत, अजय भगत, संजय भगत, दिनेश दखणे, नरेश तेलतुंबडे, डॉ. विद्या तेलतुंबडे, निलय भगत, यश बोरघाटे, इशिता बोरघाटे, श्वेता बोरघाटे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे रामभाऊ डोंगरे, विजया श्रीखंडे, गौतम पाटील, शोभा पाटील, सविता मेंढे, चंद्रकांत मेंढे, वसंत मोहिले, गुंफाताई भगत, डॉ. जितेंद्र भगत, डॉ. सोनाली भगत, केवळ सुखदेवे, हरीश सुखदेवे आणि इतर मान्यवरांनी व्यक्त केल्या. ■ ■




डॉ. सुनिल भगत
मो. 94230 64391


# नागपुरात साकारला संविधान प्रास्ताविका पार्क

## शहराच्या सौंदर्य आणि प्रेक्षणियतेत भर

*काही दिवसापूर्वी गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन यांची भेट झाली. त्यांनी अतिशय आनंदाची बातमी कानावर घातली. ते म्हणाले, तुम्हाला ठाऊक आहे काय? नागपुरात डॉ. आंबेडकर लॉ कालेजच्या शेजारी संविधान पार्क साकारल्या गेले आहे.*

दोन दिवसापूर्वी भारताचे सरन्याधिश भूषण गवई, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या देखण्या पार्कचे लोकार्पण झाले. मी म्हणालो. मला ठाऊक होते पण त्या दिवशी नागपुरात नसल्यामुळे जाऊ शकलो नाही.

गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. हिरेखांनी केलेल्या वर्णनामुळे या संविधान प्रास्ताविका पार्कचे काम पूर्णत्वास येत असतांनाच भेट दिली आणि नागपुरात साकारलेल्या या अनोख्या पार्क ला पाहून चकितच झालो, नागपूर मंडळीच्या अथक परिश्रमातून असेही मोलाचे काम होवू शकते हे बघून धन्य वाटले. आजपर्यंत नागपुरात येणाऱ्या पर्यटकांना नागपूरची दीक्षाभूमी, ड्रॅगन पॅलेस आणि काही अंतरावरील पेंच आणि ताडोबा व्याघ्र प्रकल्प व रामटेक हीच स्थळ ठाऊक होती. पण यात आणखी मोठी भर पडली. संविधान प्रस्ताविका पार्क ची. या प्रेक्षणिय स्थळाचे काम वेगाने पूर्णत्वास आले असून जूनला मान्यवरांच्या हस्ते यांचे लोकार्पण झाले.

कोणत्याही नागपूरकराचे ऊर आनंदाने भरून यावे असाच हा संविधान प्रस्ताविका पार्कचा प्रकल्प आहे. मूळ संकल्पना सर्वप्रथम ज्यांच्या डोक्यात आली ते डॉ. हिरेखन या पार्क च्या दिशेने कामाची प्रगती पाहण्यासाठी गडचिरोलीतून नागपुरात आठवड्यातून येत होते असे त्यानी सांगितले.

विधी महाविद्यालयाच्या शेजारी सुमारे तीन एकर परिसरात ही वस्तू उभी आहे. आणखी काही काम शिल्लक असल्याचे डॉ. हिरेखन म्हणाले. ते म्हणाले, मी नागपूर विद्यापीठात उपकुलसचिव असतांना मला हे सुचले. ही कल्पना कुलसचिव पूरण मेश्राम यांनी सांगितली व त्यांनी उचलून धरली. यांनी उचलून धरली या कामाचे डिझाईन, आराखडा, निधीची जमवा-जमव इत्यादी कामाला आरंभ झाला. आजच्या पिढीला संविधानाची मूल्य दृश्य (प्रतिमा) रूपाने समोर यावे आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची महत्ता पटावी या हेतूने मी व पूरण मेश्राम कामाला लागलो. कारण विद्या अधिनियम 2016 मधील कलम 4(4) मध्ये नमूद केल्या प्रमाणे स्वातंत्र्य, समता, धर्मनिरपेक्षता व सामाजिक न्याय या मूल्याचे विद्यापीठ संवर्धन करेल असे म्हटले आहे व या कलमा नुसारच संविधानाची प्रास्ताविका समर्थन करीत असल्यामुळे संविधान पार्कची निर्मिती करण्यात यावी ही माझी व कुलसचिव पूरण मेश्राम यांनी तत्कालीन कुलगुरू यांच्यासमोर मांडली व त्यांनी तत्काळ लॉ कॉलेजच्या शेजारी या पार्क च्या उभारणीचे काम करण्यास संमती दिली. तसेच विद्यापीठाच्या पुढाकराने एका समितीची स्थापना करण्यात आली. या समितीत ज्येष्ठ समाजसेवक गिरीश गांधी अध्यक्ष, उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधिश श्री. किशोर राही, माजी आमदार अनिल सोले, प्रा. जोगेंद्र कवाडे, प्रकाश गजभिये, तत्कालिन कुलसचिव पूरण मेश्राम, उपकुलचिव अनिल हिरेखन, डॉ. श्रीकांत कोमावार, आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार समिर मेघे, आमदार मोहन मते, तसेच विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर याचा समावेश आहे. सुरुवातीला गिरीश गांधी पार्कच्या कामाकरीता 5 लक्ष रू. दिले. नंतर राज्याच्या सामाजिक न्याय विभागाकडून 2 कोटी 60 लक्ष रू. चा निधी देण्यात आला. यासाठी पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे विशेष प्रबल लाभले. गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी या विद्यापीठात कुलसचिव म्हणून रूजू झाल्यानंतर डॉ. हिरेखन यांच्या विनंती आणि पाठपुराव्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याला 2 कोटी रू.चा निधी हस्तांतरित केला.






प्रभाकर दुपारे
मो. 9850304017


**कसा आहे हा पार्क** - या पार्कचे प्रवेशद्वार सांचीच्या प्रवेश द्वाराची प्रतिकृती आहे. आत शिरताच संविधान हाती घेतलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य पुतळा, संविधानातील समता, स्वतंत्र्य बंधुता न्याय, भाषण स्वतंत्र्य, इत्यादी दहा मूल्यांच्या प्रतिकृती, दृक श्राव्य माध्यमातून उभारण्यात आलेली चित्रकृती, तसे संविधानाच्या मूल्यांना स्पष्ट करणारे चित्रपट, खुला रंगमंच इत्यादी देखण्या गोष्टीचा समावेश आहे. डॉ. अनिल हिरेखन, पूरण मेश्राम, आम. नितीन राऊत यांचे प्रयत्न व सातत्याने त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे त्यांच्याच कल्पनेतून हा प्रकल्प साकार झाला आहे. नागपूरकरांनी एकदातरी नक्कीच भेट द्यावी, असा हा पार्क आहे.

**नवा आयाम** - डॉ. हिरेखन यांनी सांगितले की एका ऑडियो व्हिज्युलच्या टीमने सहा महिने सखोल अभ्यास करून हा संविधान प्रस्ताविका पार्क समिती, आंबेडकरी विचारवंत यांच्याशी चर्चा करून हा प्रकल्प तयार केला आहे. या पार्क मध्ये क्युआर कोड द्वारे ऑडियो मार्गदर्शन, अनेक भाषांमध्ये संविधानाबद्दल माहिती ऐकता व बघता येईल. मुलांसाठी रियालिटी फिल्म, भारतीय संविधानावर छोटी डाक्युमेंट्री, 3 डी होलोग्राफिक सादरीकरण, या तंत्राच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण या ठिकाणी बघण्याचा अनुभव येईल. यातून प्रेक्षकांसोबत बाबासाहेब संवाद साधत आहेत असे दिसेल. या ऑडियो, व्हिडीयो तंत्राला प्रशासकीय मान्यता मिळाली असून लवकरच हेही काम पूर्णत्वाला येणार आहे. हे तंत्र पूर्णत्वास आल्यावर संपूर्ण देशातले हे एक आश्चर्यच ठरेल. ■ ■

# प्रस्थापित व्यवस्थेविरूद्ध एल्गार

**'शकतेन अदि ही शुद्रेण न कार्यो धनसंचयः ।**
**शुद्रो ही धनम असाद्य ब्राम्हणम एक बाधते ॥'**
**(मनुस्मृती 10 - 129)**

'हिंदू राष्ट्राला पर्याय हवा' यामध्ये सावित्रीमाईने मनु व्यवस्थेने दिलेले या देशातील शेतकऱ्याविषयी काढलेले उद्गार याप्रमाणे मांडले, 'नांगर धरती शेती जे करती, मूळ ते असती मनू म्हणे । करू नका शेती सांगे मनुस्मृति, धर्मज्ञा करता ब्राम्हणास शूद्र जन्म घेती । पूर्वीचे पाप ती जन्म या फेडती, शूद्र सारे विषम रचती ।

समाजाची रिती धुर्तांची, ही निती अमानवी, तर शिक्षणाचे महत्व विषद करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'आपल्या बायका-पोरापेक्षाही विद्येवर जास्त प्रेम करा.' प्रसिद्ध विचारवंत सी. सेरा म्हणतात, ग्रंथ नसलेले घर म्हणजे जीवन नसलेले शरीर होय.' तर गाडगे बाबा म्हणतात, 'जयाचे मनी लालसा शिक्षणाची गरिबीमुळे होत असे, हातभार लावूनी, श्रेष्ठ दान करा,' अस्पृश्यतेवर हल्ला चढवितांना तुकाराम महाराज म्हणतात, 'महारास शिवे, कोणे ब्राम्हण । तो नव्हे त्या प्रायश्चित काही। देह त्याग करिता नाही। (अभक्त ब्राम्हण जडी त्याचे तोंड काया त्यात रांड प्रसवली) वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयता कुळ पाति । ऐसा निवाडा जाला से पुरानी। नव्हे माझी वाणी पदरीची । तुका म्हणे लागी थोरपणा। दृष्टी त्या दुर्जना न पडो।' याप्रमाणे विनायकरावांचे विषम व्यवस्थेला मूठमाती देण्याचे प्रयोजन असून सामाजिक समता प्रस्थापित करण्याची बांधिलकीची भूमिका महापुरूषांनी केली असल्याची विशद करतात. 'द्वेषाचे राजकारण' यामध्ये 'सांस्कृतिक दहशत लोकांच्या मनावर खोलवर रूजविला जात असल्याचे सांगून ते जे सांगतील तीच राष्ट्रभक्ती. अन् तिचेच गुणगान करा. अन्यथा जर कोणी काही नवीन सांगण्याचा, चांगले सांगण्याचा प्रयत्न केला तरी तो देशद्रोही म्हणून त्याची पूर्ण बदनामी करून त्याचेकडे संशयीत दृष्टिने पाहिले जाते. असे विनायकरावांनाच काय तर देशातील अनेक सुज्ञदृष्टी असलेल्यांना हकनाक गोवण्याचा प्रयत्न सदरील लेखकांस समज झालेला आढळून येतो. 'आंबेडकरी राजकीय विचार, प्रस्थापित व्यवस्थेच्या हाती' सदरील शिर्षकाच्या मथळ्याखाली परमपूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महतप्रयासाने जन जागृतीची मशाल पेटवून अंधार युगाला प्रकाश दाखवून उजेडात आणले. असे सार्थक विचार अनेकानेक आंबेडकरी व प्रज्ञावान बहुजन समाजांच्या नेत्यांचे असूनसुद्धा विनायकरावांनी त्याचा उद्घोषक केला नाही तर कुत्र्या-मांजरांपेक्षाहि हिन असलेल्या समाजास स्वाभिमान जागवून शिक्षणासाठी प्रवृत्त केले.




मधुकर बोरीकर
मो. 975644774





प्रशासनात उच्च पदावर कार्यरत राहून राहणीमान बदलविले, सवर्णाचे स्पर्धक बनले आणि शासनात सहभाग असावा याकरिता 'रिपब्लिकेन पक्ष' दिला. त्याने देशात आपला दबदबा निर्माण केला. 1963-64 च्या भूमिहिनांच्या सत्याग्रह आंदोलनात शासनाला तुरूंग कमी पडल्यामुळे अन्य ठिकाणी त्यांच्या डांबण्याची व्यवस्था करावी लागली, तेव्हा सदरील रिपब्लिकन पक्षाचे महत्व वाढून उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब आदि राज्यामध्ये विरोधी पक्षाचे सरकारामध्ये निवडून आलेल्या रिपब्लिकन आमदारांना मंत्रीपदाचा लाभ झाला. तर महाराष्ट्रामध्ये काँग्रेस-रिपब्लिकनच्या युतीला सत्तेचा गाजर दाखून प्रारंभ झाला. स्वाभिमान सोडून लाचारी पत्करल्यामुळे दलित पँथरचे आंदोलन सुरू झाले. अन राजकारणाच्या युतीची बांधणी कुणाशी करावी याबाबत विनायकराव सांगतात, 'परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रस्थापित व्यवस्थेला घाम फोडला होता. राजकारणात निवडूकीत कोणासोबत युती करावयाची याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. काँग्रेस, जनसंघ, कम्युनिस्ट यांच्या बरोबर युती करू नये, तर समाजवादी पक्षाबरोबर युती करावी असे सुचविले होते. आंबेडकरवाद काँग्रेस अंमलात आणिल असे भासवून आंबेडकरी जनता काँग्रेसमय करण्याचा प्रयत्न सुरू आहे. हे थांबले पाहिजे असे विनायकरावांचे स्पष्ट मत आहे आणि आंबेडकरी जनतेला त्यांनी आवाहन केले आहे की, 'आंबेडकरी समूह एकत्रित कसे येतील याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. आपसातील मतभेद बसून मिटवावे. परत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वाभिमानी माणूस बनविण्याची, समता, बंधुत्वाची, करूणेची समाज संधी देणारी स्त्री पुरूष समतेची शिकवणूक देणारी व्यवस्था आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. आंबेडकरी स्वतंत्र संघटना बांधून सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करावा. भाजप, काँग्रेस यांचे हातचे खेळणे बनू नये. आंबेडकरवादाचे सोंग घेऊन येणाऱ्याची ओळख करून त्यांच्या नांदी लागू नये. तर रिपब्लिकन पक्षाची एकजूट होऊन परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार होईल.' असा भरभक्कम ठोस आशावाद विनायकरावांना आहे. 'ओबीसी ची मानसिकता' यामध्ये विनायकराव जामगडे लिहितात, 'आज ओबीसी आरक्षणासाठी मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण होत आहे. उत्तम बाब आहे. ही जागृती व्यवस्था परिवर्तनासाठी असली पाहिजे. केवळ राजकीय आरक्षणासाठी नसावी. भाजपा भूलथापा देत आहे. ज्यांनी ओबीसी आरक्षणासाठी विरोध केला. मंडल विरोधात कमंडल यात्रा काढून रामाच्या नावाने विटा वाहण्यास ओबीसींना बाध्य केले व आपल्या पायावर कुऱ्हाड मारण्याचे कार्य केले. ओबीसी विद्यार्थी यांना शिष्यवृत्ती मिळवी, नोकरीत प्रमोशन मिळावे, 27 टक्के आरक्षण देण्यात यावे, याला भाजपाचा व काँग्रेस पक्षाचा विरोध होता... दोन्ही पक्ष येथील प्रस्थापित व्यवस्थेचे रक्षण करण्याचे कार्य करीत आहेत. आरएसएस शाखा भाजपा असून मनुवादी व्यवस्थेची समर्थक आहे. काँग्रेस पक्षाचे सुद्धा चारित्र्य वेगळे नाही. ज्यावेळी व्ही. पी. सिंग देशाचे प्रधानमंत्री होते. त्यांनी आपल्या सत्तेची आहुती देऊन मंडल आयोग लागू केला. म्हणूनच ओबीसींना 27 टक्के आरक्षण मिळत आहे. त्यांचे सरकार पाडण्याचे काम भाजप व काँग्रेस पक्षांनी केले.' सदरील दोन्ही पक्ष ब्राम्हणी व्यवस्था म्हणजेच मनुवादी व्यवस्थेची तारक असल्याचे व कायमस्वरूपी ठेवण्यासाठी उठाठेवी करण्याची कसरत करीत असल्याचे कणखर आंबेडकरवादी विनायकराव जामगडे यांचे स्पष्ट मत आहे. पुढे 'कायद्याचे संरक्षण कोणाला' या लेखात सांगतात, 'भारतीय राज्यघटनेने सर्वांना समान अधिकार व समान न्याय दिला. सर्वच जाती व पंथ यांना त्यांच्या उपासना करण्यास मोकळीक दिली. आपापल्या श्रद्धेनुसार आचरण करणे व ती व्यक्त करण्याची मुभा दिली. आपला देश धर्मनिरपेक्ष असून प्रत्येक धर्माच्या लोकांना ज्यांची प्रार्थनास्थळे उभारण्याचा, पूजा-अर्चना करण्याचा अधिकार बहाल केलेला आहे. हे अधिकार भारतीय राज्यघटनेने दिलेला असून सर्वच भारतीयांना समान रूपाने लागू असून देखील ग्रामीण भागात हिन्दू देवळे सर्रास उभी राहतात तर बौद्ध धम्मीय लोकांना त्यांची उपासना करणेकरिता आडकाठी केली जाते.

क्रमशः ■ ■

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## महत्वाचे

### कर्मवीर हरिदास आवळे यांच्या 110 वी जयंतीनिमित्त आज परिसंवाद



**नागपूर :** कर्मवीर हरिदास आवळे बाबू प्रतिष्ठान द्वारा धम्मरक्षक कर्मवीर बाबू हरिदास आवळे यांच्या 110 व्या जयंतीचे 1 जुलै 25 ला डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेशन सेंटर, टेका नाका, कामठी रोड, नागपूर या ठिकाणी दु.2-30 वा. आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी कार्यकर्त्यांना पुरस्कार व सन्मानपत्र वितरण करण्यात येणार आहे. तसेच परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे परिसंवादाचा विषय 'कर्मवीर हरिदास आवळे यांची सम्यक दृष्टी व वर्तमान स्थितीत आंबेडकर अनुयायांची भुमिका' यावर ज्येष्ठ पत्रकार श्रीमंत माने व श्रीपाद अपराजित, सामाजिक न्याय विभाग, नागपूर प्रादेशिक उपायुक्त सिद्धार्थ गायकवाड व ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्रा. डॉ. रणजित मेश्राम हे आपले विचार मांडणार असुन कार्यक्रमाचे अध्यक्ष विनायकराव जामगडे हे आहेत तरी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आवळे बाबू प्रतिष्ठानद्वारे केले आहे.

### संघर्षपर्व सिस्टर रंजना पुस्तकाचे आज प्रकाशन




**नागपूर :** मेडिकल शासकीय रुग्णालयातील बालरोग विभागातील वरीष्ठ परिचारिका रंजना युवराज लोखंडे वयोमानानुसार 30 जून 2025 रोजी सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांनी शासकीय रुग्णालयात अविरत सेवा केली. अनेकांना आर्थिक मदत करून आपल्या सेवेचा परिचय दिला आहे. कोविड काळात तर सर्वतोपरी सहकार्य केले आहे. बामसेफ, बुद्धिस्ट संडे स्कूल, परिवर्तन विचार मंच, आविष्कार कला अकादमी, संथगारा संस्था सह अन्य संस्थेत कार्यरत आहेत. त्यांच्या आयुष्यात अनेक संघर्षांवर संघर्षपर्व सिस्टर रंजना पुस्तक मान्यवर व्यक्तींच्या हस्ते मंगळवार दि. 1 जुलै 2025 रोजी दुपारी 4 वाजता संत रवि दास सभागृह राज्य विमा दवाखानाजवळ, नागपूर येथे होते आहे, असे आयोजकांनी कळविले आहे.

### नगर पंचायत बहादुरा प्रशासन आपल्या दारी



**संवादमित्र श्रीकांत शहारे, बहादूरा :** महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांच्या निर्देशानुसार बहादुरा नगर पंचायत कार्यश्रेत्र अंतर्गत बहादुरा, खरबी, गोन्हीसीम येथील विकास कामे, पावसाळ्यामध्ये समस्या जाणून घेणे, स्वच्छता विषयक बाबी, प्रधानमंत्री आवास योजना, विद्युत समस्या, भूमिगत नाली बांधकाम, पाणी पुरवठा, अतिक्रमण इत्यादी कामाविषयी नागरिकांकडून आलेल्या तक्रारीचे निवारण करण्यात करिता बहादुरा येथील वार्ड क्र. 5 येथील श्रेत्रातील विविध समस्या जाणून घेण्याकरीता, नगर पंचायत बहादुरा येथील प्रशासक तथा मुख्यधिकारी राजेंद्र चिखलखुंदे, प्रशासकीय अधिकारी सागर ठाकरे, पाणी पुरवठा अभियंता श्रीकांत समर्थ, शहर अभियंता अक्षय झिरपे, सहाय्याक नगर रचनाकार रवी हिरुरकर, विद्युत अभियंता मिलिंद पाटील सामाजिक कार्यकर्ता ज्योती बोकडे, बाबा बोकडे, नरेंद्र नांदुरकर, राहुल गायधने, सुभाष गुजरकर, शुभांगी गायधने, बालू लाडगे यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. विविध विभागातील कर्मचारी हे वार्ड क्र. 5 मधील बावनकुळे सभागृह, बहादुरा येथे उपस्थित राहून नागरिकाचे समस्या जाणून घेतल्या असून सदर ठिकाणी मोहीम दरम्यान नागरिकांनी विविध विषयाबाबत, एकूण 43 अर्ज सादर केले असून अनेक नागरिकांनी त्यांच्या अडचणी बाबत मौखीकरीत्या अवगत केले असून तसेच 10 ते 12 ठिकाणी मुख्यधिकारी व सर्व विभाग प्रमुख त्यांच्यासह प्रत्यश्र स्थळ पाहणी करण्यात आली व संपूर्ण प्राप्त झालेल्या तक्रारी तत्काळ निवारण करण्याकरीता मुख्यधिकारी यांनी संबंधित विभागप्रमुख यांना सूचित केले.

### निधन वार्ता

#### मंजुळाबाई बळीराम लोखंडे



**नागपूर :** मंजुळाबाई बळीराम लोखंडे यांचे वृद्धापकाळाने आज सायंकाळी पाच वाजता दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय 82 वर्षे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली बराच आप्त परिवार आहे. वैशाली घाटावर त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जाती प्रमाणपत्र नोंदणीच्या आधारावर जातीचे वैधता प्रमाणपत्र तत्काळ निर्गमित करा

## मानव अधिकार संरक्षण मंचचे मंत्री संजय शिरसाट यांना निवेदन

**नागपूर :** जात प्रमाणपत्र मिळविण्याकरिता 1950 च्या पूर्वीचे दाखले आवश्यक असल्याकारणे त्याची पूर्तता केल्याशिवाय जात प्रमाणपत्र मिळत नाही. 1950 पूर्वीच्या आवश्यक दाखल्यांची पूर्तता झाल्यावर सर्व तपासणी अंती उपजिल्हाधिकारी यांचे सही शिक्केनिशी जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते. सर्व प्रक्रिया हि ऑनलाईन असल्यामुळे संबंधित व्यक्तीचे 1950 पूर्वीचे सर्व कागदपत्रे त्याच्या जातीच्या नोंदणी क्रमांकावर जमा होतात.

त्याच धर्तीवर जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्याकरिता पुनश्चः 1950 पूर्वीच्या आवश्यक दाखल्यांची पूर्तता करावी लागते. दरवर्षी लाखो विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्राकरिता अर्ज करतात. सदर जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता जवळपास 1 महिन्याच्या वर कालावधी




लागतो. त्यातल्यात्यात एखादे कागदपत्र कमी असल्यास त्रुटी काढण्यात येते. त्रुटी पूर्ण केल्यावर जवळपास 15 ते 20 दिवसांचा कालावधी लागतो. त्रुट्या आणि सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता एकंदरीत 2 महिन्याचा कालवधी लागतो. दरम्यान बऱ्यापैकी विद्यार्थ्यांचे कॅप राउंड सुरु होतात. ऐन कॅप राउंडच्या वेळी विद्यार्थ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसतात. विभागाकडून वेळेवर प्रमाणपत्र मिळत नसल्याने विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित व्हावे लागते.

आशिष फुलझेले यांना आरटीआय मध्ये मिळालेल्या उत्तरात

1) वर्ष 2022-23 मध्ये समिती स्तरावर 4,23,334 प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी 3,57,586 प्रकरणे वैध ठरली व त्यापैकी 62,353 प्रकरणे प्रलंबित राहिली.

2) वर्ष 2023-24 मध्ये समिती स्तरावर 3,90,337 प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी 3,58,095 प्रकरणे वैध ठरली व त्यापैकी 28,658 प्रकरणे प्रलंबित राहिली.

3) वर्ष 2024-25 मध्ये समिती स्तरावर 4,41,061 प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी 3,79,077 प्रकरणे वैध ठरली व त्यापैकी 56,325 प्रकरणे प्रलंबित राहिली.

प्रशासनाच्या स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित झाली असल्याने मागील 3 वर्षात लाखो विद्यार्थ्यांचे उच्च




## धम्मदीप बुद्ध विहार

शांतीनगर, नागपूर. हे विहार 1976 ला स्थापन झाले. या विहारात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असून वर्षावास हा येथील विहाराचा मुख्य कायक्रम आहे. सोबत महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी सुद्धा या विहारात करण्यात येत असतात बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन होत असून विहाराच्या आत मध्ये डॉ. बाबासाहेब यांचा अर्ध पूर्णकृती पुतळा आहे. विहाराचे अध्यक्ष विहाराचे कोषाध्यक्ष म्हणून कृष्णाजी बोरकर कार्यरत आहेत

संवाद मित्र, राजकुमार वंजारी
मो. 9422550041

## महा. अंनिस डिजिटल अंधश्रद्धा निर्मूलनावर परिषद घेणार

**नागपूर :** आजच्या सोशल मिडियाच्या जगात वाट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम, टीव्ही, यांसारख्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सर्रासपणे अंधश्रद्धा पसरविली जात आहे व समाजमनावर विपरीत परिणाम होत आहे. याचे संज्ञान मध्यवर्ती कार्यालयाने घेतले असून लवकरच जिल्हा पातळीवर डिजिटल अंधश्रद्धा निर्मूलनाचे दोन दिवसाची परिषद आयोजित करण्यात येईल अशी माहिती राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी मासिक सभेत प्रस्तुत केली. शोभा पॅलेस वाठोडा येथे इंजी. गौतम पाटील यांच्या निवासस्थानी झालेल्या या सभेचे अध्यक्ष माजी बालविकास प्रकल्प अधिकारी उत्तम सालवनकर हे होते, तर रामभाऊ डोंगरे मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला इंदु उमरे व मंगला गाणार यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले तर देवानंद बडगे यांनी चळवळीचे गीत सादर करुन कार्यकर्त्यांत जोश संचार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे यांनी सादर करतांना मागच्या सभेचा वृत्तांत व त्यांची अंमलबजावणीचा आढावा घेतला. सभेत अंधश्रद्धा निर्मूलनाच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यात आली. त्यात प्रामुख्याने डिजिटल अंधश्रद्धा निर्मूलन, विवाह संदर्भातील ज्वलंत धोके, हुंडाबळी तील शोषित पिडीत महिलांना न्याय, आदिवासी आश्रमशाळेतील



विद्यार्थ्यांना जादुटोणा विरोधी कायद्याचे माहिती, वैज्ञानिक दृष्टीकोन ई. प्रमुख मुद्दे होते. या प्रसंगी प्रा. पुष्पा घोडके यांनीपण सभेला संबोधित केले. कार्यक्रमाचे संचालन उ. ना. चे कार्याध्यक्ष देवानंद बडगे यांनी केले तर आभार जिल्हा लेखा प्रभारी चंद्रशेखर मेश्राम यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला अरविंद तायडे, वसंत मोहिले, विजया श्रीखंडे, माया सुखदेवे, शारदा मोटघरे, दिप्ती नाईक, वर्षा टेंभेकर, प्रा. पुष्पा घोडके, डॉ. जय प्रकाश बोधी, अविनाश सुखदेवे, गौतम पाटील, शोभा पाटील, डॉ. सुनील भगत, देवयानी भगत, प्रिती नगरारे, दलित मित्र माया घोरपडे, राजकुमारी पोफरे, आंचल पाटील व अन्य सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी मुंबई चेंबूरात मानवी साखळी आंदोलन

**मुंबई :** तथागत गौतम बुद्ध यांना बिहार गया येथे बोधि साक्षात्कार झाला. त्याला हजारो वर्ष झाली आहेत. त्या पवित्रस्थळी सम्राट अशोकाने बुद्धगया येथे महाबोधी महाविहारची निर्मिती केली. सोने चांदी होरे माणिक मोती यांनी मडविलेल्या या बुद्ध मूर्तीची लूट करून महाविहारची मोडतोड केली. त्यानंतर सम्राट कनिष्क पुत्र यांनी या महाविहारचा जीर्णोद्धार केला होता. ते महाविहार बौद्धांच्या ताब्यात मिळण्यासाठी अनागरिक धम्मपाल यांनी संपूर्ण आयुष समर्पित केलेले आहे. हा गेली 134 वर्षांचा संघर्ष सुरू असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांनी हा लढा आणि संघर्ष अखंड सुरू ठेवला आहे. 12 फेब्रुवारी 2025 पासून बुद्ध गया येथे महाबोधी महाविहार मुक्तीचे जन आंदोलन सुरू आहे. त्याला भारत वर्षातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला चेंबूर पी.एल. लोखंडे मार्ग येथून महाबोधी महाविहार मुक्तीसाठी सर्व पक्ष संस्था संघटना मिळून धरणे, मोर्चा आंदोलन मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहेत.



चेंबूर विभागातून अधिक लोकजागृती होण्यासाठी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समितीच्या वतीने रविवार दि. 29 जुन 2025 रोजी सकाळी 11.00 ते 1.00 वाजे पर्यंत पी.एल. लोखंडे मार्ग दोन्ही बाजूंनी मानवी साखळी आंदोलन करण्यात आले होते. या जन आंदोलनात विभागातील बौद्ध उपासक उपासिका सफेद वस्त्र परिधान करून मोठ्या प्रमाणात साखळी आंदोलनमध्ये सहभागी झाले होते. विशेष म्हणजे या आंदोलनात मुस्लिम महिला देखील सहभागी झाल्या होत्या. बौद्ध टेम्पल अॅक्ट 1949 रद्द झालाच पाहिजे. अशा घोषणांनी चेंबूर विभाग दणाणून गेला होता. या साखळी आंदोलन मध्ये स्थानिक नगरसेविका संगीता हांडोरे, आंबेडकरी ज्येष्ठ नेते किसन माने, जेष्ठ साहित्यिक आनंद म्हस्के, आर पी आय वॉर्ड अध्यक्ष जयकार माघाडे, बीआरएसपीचे दीपक चौगुले, राजू आढाव, वंचितांचे अध्यक्ष मयूर आठवले, समाजभूषण पुरस्कार विजेते राजेंद्र झेंडे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यास समितीचे शरद शेळके, सुरेश भंडारे, विनोद पवार, आकाश साळवे, रितेश लोखंडे, बोराडे, रितेश शिरसाट, प्रवीण बागुल, प्रदीप अडंगळे, अमोल सोनवणे, राजाराम आढाव, मंगेश मोरे, रितेश पवार, स्वप्नील गायकवाड, भारत माने, बिपीन माने, राहुल सुरडकर, अक्षय साळ्वे, अलका दीपनकर आदींनी परिश्रम घेतले.

## आंतरराष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धेत दिया पाटीलने पटकावला 'द क्रिएटिव्ह आर्टिस्ट अवॉर्ड'

**चोपडा :** रंगोत्सव सेलिब्रेशन, मुंबई आयोजित आंतरराष्ट्रीय कला स्पर्धेत प्रताप विद्या मंदिर इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी बहुमान पटकावला आहे. या स्पर्धेत विविध इयत्तांतील विद्यार्थ्यांनी रंगभरण, हस्ताक्षर, ग्रीटिंग कार्ड व फिंगर अँड थम्ब अशा विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेत उल्लेखनीय कामगिरी केली.



विशेषत : दिया भाग्यश्री श्रीकांत पाटील (इयत्ता 2री) हिने 'द क्रिएटिव्ह आर्टिस्ट अवॉर्ड' मिळवत ह फुल डिजिटल कॅमेरा व मेडल हा पुरस्कार जिंकला. तर मैत्रयी संतोष कदम (इयत्ता 6वी) हिने रंगभरण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत ट्रॉफी व Spectacular Performance Award तिच्या सह इतर दहा विद्यार्थ्यांनी पटकावला.

रंगोत्सव तर्फे प्रति वर्षाप्रमाणे यंदाही इंटरनॅशनल आर्ट कॉम्प्युटिशन आयोजित करण्यात आली होती. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रताप विद्या मंदिर इंग्लिश मीडियम स्कूलच्या अकरा विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी वेगवेगळ्या प्रकारात पदके व बक्षिसे पटकावली.

सर्व सुयश प्राप्त यशस्वितांचे संस्थेचे अध्यक्ष चेअरमन राजाभाई मयूर, अध्यक्ष शैलाबेन राजेंद्र मयूर, उपाध्यक्ष विश्वनाथ सीताराम अग्रवाल, सचिव माधुरी मयूर, समन्वयक गोविंद गुजराथी, प्राचार्य रजीश बालन आदींनी अभिनंदन केले आहे.

या स्पर्धेत कलाशिक्षिका म्हणून मनिषा पाटील व निखिला रजीश यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या यशामागे शाळेचे प्राचार्य रजीश बी., तसेच कला शिक्षक मनीषा पाटील व निखिला रजीश यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना योग्य दिशा देण्यासाठी शाळेतील शिक्षकांचे योगदान कौतुकास्पद आहे. बक्षीस प्राप्त सर्वांचे अभिनंदन होत आहे.



## सदम देसना आणि वासिकासाटिका दान समारोह

**नागपूर :** बोधिपखीय फाउंडेशन तथा शाक्यधीता संघचे माध्यमातून बॅरी. राजाभाऊ खोब्रागडे प्रतिष्ठान सभागृह हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला अजाण जयसारो इंग्लंड इथून आले असून त्यांनी श्रद्धा व शील यावर प्रवचन केले. तसेच वनस्वामी महाथेरो यांनी प्रज्ञा सोबत श्रद्धा असणे गरजेचे आहे. सम्यक समाधी हा बुद्धाने सांगितलेला मार्ग असून पंचशीलाचे पालन उपासकांनी करावे यावर विस्तृत माहिती दिलेली आहे. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेल्या शिलाचारा महाथेरो असून धर्मेश प्रसेंजित फुसाटे यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले, तसेच अय्या धम्मदिना यांनी संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी पार पाडली व धम्मदेशना दिली. कार्यक्रमाचे संचालन तक्षशिला वाघधरे यांनी केले. प्रास्ताविक मेत्ता चित्ता यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय ज्योती आवळे ममता बोदिले यांनी केला. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता अंबादे, कांचन भस्मे, सुनिता चारभे, शार्दुल्ला महाजन, भगत यांनी सहकार्य केले.

## मेडिकलमधील नागरिकांना होणाऱ्या असुविधा व समस्यांबाबत पालकमंत्र्यांना निवेदन



**नागपूर :** येथील शासकीय वैद्यकिय महाविद्यालय येथे सर्वसामान्य नागरिक उपचारासाठी दूरवरून येत असतात. परंतू मुलभूत सुविधांचा अभाव असल्याने त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसतो आहे. दिवसेंदिवस शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील समस्या वाढत असून यावर अनेक निवेदन देऊनही यावर कुठलीच उपाययोजना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाकडून केल्या जात नाहीत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील समस्याप्रमाणे खाजगी इस्पितळात CT-SCAN, MRI आणि ईतर अन्य चाचणी केल्यानंतर लगेच 2 तासांत रिपोर्ट देण्यात येते. त्याच धर्तीवर मेडीकलमध्ये सुद्धा देण्यात यायला पाहिजे. पण तब्बल 6 ते 8 तासानंतर रिपोर्ट सादर करण्यात येते. म्हणून अद्यावत यंत्र तसेच मनुष्यबळ उपलब्ध करून तात्काळ सामान्यांना न्याय द्यावा.

शासकीय वैद्यकिय महाविद्यालय येथील स्वच्छतागृहास नेहमी कुलूप लागून असल्याने नागरिक त्रस्त आहेत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय CT SCAN चे रिपोर्ट्स वेळेवर मिळत नाहीत. अनेकदा रुग्ण व MRI काढण्यासाठी पण 15 दिवसानंतर तारीख देण्यात येते. इत्यादी उपरोक्त विषयाची गंभीर दखल घेऊन सर्वसामान्य रुग्ण तथा नागरिकांच्या समस्येबाबत उचित कार्यवाही करावी असे अनिकेत कुत्तरमारे, प्रियदर्शी सम्राट अशोक बहु. संस्था नागपूर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले

## गुरुदेव सेवा मंडळ मंगलदिपनगर तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**नागपूर :** श्री गुरुदेव सेवा मंडळ मंगलदिप नगर व आमची आई वटवृक्षाची सावली बहुउद्देशीय सेवा प्रतिष्ठान मंगलदिप नगर दक्षिण नागपूरच्या वतीने कर्मयोगी संत तुकारामदादा गीताचार्य पुण्यस्मृति व छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त 'सर्व संत महापुरुष संयुक्त ग्रामजंयती' महोत्सवाच्या पर्वावर दहावी, बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच निःशुल्क उन्हाळी शिबिराचा समारोप मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.. ज्ञानेश्वरदादा रक्षक. प्रवर्तक श्री गुरुदेव युवा मंच सिमरण शंकरराव थुल, मुख्य वक्ता, संगीत विशारद दिपक बनसोड, देवीदास लाखे, कांता चंद्रभान राऊत. अध्यक्ष, प्रमिला शाम वरठी, संचालक, आमची आई वटवृक्षाची सावली बहुउद्देशीय सेवा प्रतिष्ठान यांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा झाला. श्री गुरुदेव सेवा मंडळ मंगलदिप नगरच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षीसुद्धा विविध उपक्रमा अंतर्गत दि. 19 जून ते 26 जून पर्यंत निःशुल्क उन्हाळी सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरार्थींना इंग्लिश स्पिकींग, मॅथेमॅटीक ट्रीक्स, हॅन्डराईटींग, रिडिंग, स्वसंमोहन प्रक्रिया, संगीत, मेडीटेशन, व्यक्तिमत्व विकास, मातृपितृ पुजन प्रणालीतून एक आदर्श विद्यार्थी घडावा. विद्यार्थ्यांमधे आत्मविश्वास निर्माण व्हावा हिच सर्वांगीण सुसंस्कार शिबिराची संकल्पना. रक्षक यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना आजचे सान सान बालक उद्याचे तरुण कार्यकर्ते होतील. मुख्य वक्ता. सिमरण थुल यांनी विद्यार्थ्यांना संत महापुरुषांचे विचार, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख यांच्या विचाराला आत्मसात करावे तेव्हाच समभाव समानत निर्माण होईल असे मनोगत व्यक्त केले. बनसोड यांनी दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच इंग्लिश स्पिकींग, संगीत, मेडीटेशन, मातृपितृ देवो भव. वर्ग 12 वा. हितांशी गिरीधरराव राऊत, श्रावणी नरेंद्र पडोळे, निधी दिलीपराव कापसे, राही एकनाथ घोडे, सुश्रुत श्रीरंग बोरीकर, नयन देवेंद्र किनकर, हर्ष पुण्यशील सांगोळे, वर्ग 10 वा. समीर शामसुंदर फुलेवाले, समीक्षा शामसुंदर फुलेवाले, पियुष मनिषा राणे, नैतिक भुषण मेश्राम, अन्यना पुण्यशील सांगोळे, तनिष्का खोब्रागडे, मनस्वी प्रेमराज तांबुसंकर, महिमा मोरेश्वर मेश्राम, राजेश्वरी ईश्वर लोनकर यांना गौरविण्यात आले. शिबिरार्थींचें कौतुक करण्यात आले. राष्ट्र वंदनाने कार्यक्रमाचा समारोप झाला.




बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648